**श्री नेत्रालय हॉस्पिटल नवीन जागेत**
विश्वकर्मा कॉम्प्लेक्स, १ ला मजला, दत्तमंदिर चौक, देवपूर, धुळे
- कॉम्प्युटरच्या सहाय्याने डोळे तपासणी व उपचार
- फेको पद्धतीने व बिनटाक्याच्या पद्धतीने माफक दरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येईल.
- तपासणी वेळ : संध्या. ४ ते रात्री ९ पर्यंत
मो.नं.९५१८३९७५९२ / ९४२१५१७६६३



# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६८ ■ अंक क्र.१४३ ■ रविवार २ मार्च २०२५ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ८

POST REGD.NO./DHL/53/24-26



**डॉ.गौतम शाह धुळ्यात उपलब्ध**
गुडघे दुखी, कंबरदुखी, स्लीप डिस्क, संधीवात, सायटीका या रुग्णांवर ओझोन थेरपी व गुडघ्याची इंजेक्शन थेरपीने यशस्वी उपचार
**दि.३ मार्च ते ८ मार्च २०२५ या कालावधीत धुळे येथे उपलब्ध असणार आहेत.**
संपर्क :- **डॉ.गौतम शाह M.S.** (ऑर्थो) शाह क्लिनिक श्री.विठ्ठल हॉस्पीटल, जुने आस्था हॉस्पीटल, रामवाडीसमोर, मालेगावरोड, धुळे (फोन नं.०२५६२-२३५११३) भ्रमणध्वनी-०८६००३५१०००/९८८१२७८६९८


## वाल्मिक कराड हाच नंबर एकचा आरोपी देशमुख हत्या प्रकरणी दोषारोपपत्र दाखल

**बीड, दि.१- पवन उर्जा प्रकल्पात तिनशे कोटी रुपयांची गुंतवणूक करणाऱ्या आवादा कंपनीकडून दोन कोटी रुपयांची खंडणी मागणाऱ्या वाल्मिक कराड याचा आवाज आणि कंपनीतील कर्मचाऱ्यांचे आवाजाचे एकमेकांशी जुळणारे नमूने, हत्या प्रकरणातील आरोपींचा खंडणीशी गुन्ह्याशी असणारा सहसंबध दाखविणारे सीसीटिव्ही चित्रणे या ऐवजासह राज्य गुन्हा अन्वेषण विभागाने संतोष देशमुख हत्या प्रकरणातील दोषारोप पत्र दाखल केले असल्याचे स्पष्ट झाले आहे.**



सुमारे १८० साक्षीदार, पंच यांच्या मदतीने तपासानंतर केल्यानंतर दाखल गुन्ह्यातील आरोपींचा सूत्रधार वाल्मिक कराड असल्याने त्यास पहिल्या क्रमांकाचा आरोपी बनविण्यात आले आहे. तपास अधिकारी बसवराज तेली यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या तपासातील डिजिटल स्वरुपाचे पुरावे न्यायवैधक प्रयोगशाळेकडून तपासून दोषारोप तयार करण्यात आले आहे. दोषारोप पत्रातील क्रमांक दोनचा आरोपी विष्णू चाटे याच्या दूरध्वनीवरुन २९ नोव्हेंबर रोजी वाल्मिक कराड याने खंडणी मागताना, अरे ते काम बंद करा, ज्या परिस्थितीमध्ये सुदर्शनने सांगितले त्या परिस्थिती ते बंद करा. अन्यथा त्याचे परिणाम गंभीर होतील. काम चालू केले तर याद राखा असे **(पान ८ वर)**

## एचएसआरपी नंबर प्लेटला एक महिन्याची मुदतवाढ

पुणे, दि.१- सन २०१९ पूर्वी खरेदी केलेल्या जुन्या वाहनांना अत्याधुनिक अशी उच्च सुरक्षा पाटी (हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबरप्लेट) ३० मार्चपूर्वी बसवणे अनिवार्य करण्यात आले होते. त्याला आता ३० एप्रिलपर्यंत मुदत देण्यात आली आहे. यासाठी राज्य सरकारकडून तीन कंपन्यांना टेंडर देण्यात आले आहे. त्यानुसार पुणे प्रादेशिक परिवहन विभागात उच्च सुरक्षा पाटी बसवण्याचे काम सुरू असून, त्याला वाहनधारकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. शिवाय याला एक महिन्याची मुद-तवाढ देण्यात आली आहे अशी माहिती परिवहन आयुक्तांकडून देण्यात आली. देशातील सर्व वाहन उत्पादक कंपन्यांना १ एप्रिल २०१९ पासून सर्व वाहनांना हाय सिक्युरिटी **(पान ८ वर)**

## काँग्रेसकडून विधिमंडळ पक्ष पदाधिकारी जाहीर महाराष्ट्र प्रभारी चेन्नीथलांनी केल्या नियुक्त्या

**मुंबई, दि.१- काँग्रेसच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदी हर्षवर्धन सपकाळ यांची निवड झाल्यानंतर आता काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या मान्यतेने काँग्रेस विधिमंडळपक्षपदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. या नियुक्त्यांमध्ये सतेज पाटील, अमिन पटेल, अमित विलासराव देशमुख, विश्वजित कदम आदी नेत्यांकडे महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या सोपवण्यात आल्या आहेत.**



विधानसभेतील काँग्रेसच्या उपनेतेपदी आ.अमीन पटेल यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर मुख्य प्रतोदपदी माजी मंत्री आ.अमित विलासराव देशमुख यांची आणि सचिव पदी आ.डॉ.विश्वजीत कदम यांची निवड करण्यात आली आहे. त्याबरोबरच प्रतोदपदी शिरीषकुमार नाईक आणि संजय मेश्राम यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. विधानपरिषदेत गटनेतेपदी आमदार सतेज ऊर्फ बंटी पाटील यांची निवड करण्यात आली आहे. तर मुख्य प्रतोद पदी आ.अभिजीत वंजारी आणि प्रतोदपदी राजेश राठोड यांची नियुक्ती करण्यात आल्याची माहिती महाराष्ट्र काँग्रेस प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी दिली आहे. विधिमंडळात काँग्रेस पक्षाच्या आमदारांची संख्या कमी झाली असली तरी उत्साह व ऊर्जा कायम असून जनतेच्या हिताचे प्रश्न सभागृहात मांडून त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न काँग्रेस पक्ष करेल. सत्ताधारी पक्षाला जाब विचारण्यासाठी पक्षाचे नवे शिलेदार महत्त्वाची भूमिका बजावतील, अशा शब्दात प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.

## ज्येष्ठ लेखिका डॉ.मीना प्रभू यांचे निधन

पुणे, दि.१- ओघवत्या



शैलीतील प्रवास वर्णनपर लेखनातून मराठी वाचकांना देशोदेशीची सफर घडवून आणणाऱ्या आणि या लेखन प्रकाराला वाङ्मयीन प्रतिष्ठा मिळवून देणाऱ्या ज्येष्ठ लेखिका डॉ.मीना सुधाकर प्रभू (वय ८५) यांचे अल्पशा आजाराने शनिवारी निधन झाले. त्यांच्यामागे दोन मुलगे, मुलगी, सुना आणि नातवंडे असा परिवार आहे. प्रभू यांच्या पार्थिवावर वैकुंठ स्मशानभूमीत सायंकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. डॉ.मीना प्रभू यांचा जन्म २७ ऑगस्ट १९३९ रोजी पुण्यात झाला. बी.जे. वैद्यकीय महाविद्यालयातून **(पान ८ वर)**

## धुळ्यातील ट्रान्सपोर्ट कार्यालय फोडणारा चोरटा जेरबंद चाळीसगावरोड पोलिसांची कारवाई; मुद्देमालही जप्त

**धुळे, दि.१- शहरातील अभय कॉलेज जवळील गौरव राडवेज ट्रान्सपोर्ट कार्यालयाचा मागील दरवाजा तोडून अज्ञात चोरट्याने रोख रक्कम, मोबाईल, पाकीट असा मुद्देमाल चोरून नेल्याची फिर्याद विकास बन्सीलाल पाटील यांनी नोंदवली होती. चाळीसगाव रोड पोलीसांनी तपासचक्र फिरवून चोरट्याला काही तासांत गजाआड केले असून त्याच्याकडून रोख रक्कम, मोबाईल व पाकिट हस्तगत केले आहे.**



विकास पाटील यांचे गौरव रोडवेज ट्रान्सपोर्ट कार्यालयाच्या मागील लाकडी दरवाजा तोडून अज्ञात चोरट्याने पन्नास हजारांची रोख रक्कम, मोबाईल, पाकीट असा एकुण पंच्यावन्न हजार शंभर रूपयांचा मुद्देमाल चोरून नेला. याप्रकरणी चाळीसगाव रोड पोलीस स्टेशनला गुन्हा नोंदविण्यात आला होता. सी.सी.टी.व्ही. फुटेज व इतर माहितीच्या आधारे पथकाने शोध घेतला. जावीद अब्दूल रहेमान खान (वय २९)रा. मिस्बाह मशिद जवळ, अंबिका नगर, जुना वडजाई रोड, धुळे याला तीन **(पान ८ वर)**

## सुलतानपूर आश्रम शाळेत एकलव्य मॉडेल स्कूलच्या तेरा वर्षीय विद्यार्थिनीची आत्महत्या; कारण अस्पष्ट

**शहादा, दि.१ (का.प्र.)- सुलतानपूर ता.शहादा येथील आदिवासी विकास प्रकल्प संचलित शासकीय आश्रम शाळेतील मुलींच्या वसतीगृहातील इयत्ता आठवीतील तेरा वर्षीय एकलव्य मॉडेल आधारित केंद्रीय आश्रम शाळेच्या विद्यार्थिनीने आत्महत्या केल्याची घटना घडली. तिच्या आत्महत्येचे कारण अद्याप स्पष्ट झाले नसले तरी तिने टोकाचे पाऊल कां उचलले याबाबत तर्क वितर्क लावण्यात येत आ-हेत. दरम्यान, मुलीच्या मृत्यूस केंद्रीय आश्रम शाळा प्रशासन व तेथील कर्मचारीच जबाबदार असल्याचा आरोप मयत विद्यार्थीच्या नातेवाईकांनी केला आहे.**



केंद्रीय आश्रम शाळा मोहिदा ता.शहादा या शाळेच्या इमारतीचे बांधकाम सुरू असल्याने दोन वर्षापासून तात्पुरते स्थलांतर शासकीय आश्रम शाळा सुलतानपूर येथे करण्यात आले आहे. या शाळेत इयत्ता सहावी ते आठवीचे १३३ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. यांत ७० मुली व ६३ मुले आहेत. सर्व मुलींची निवास व्यवस्था शासकीय आश्रम शाळेच्या मुलींच्या वसतीगृहातील तिसऱ्या मजल्यावर करण्यात आली आहे. दि.२८ फेब्रुवारीला रात्री सर्व विद्यार्थीनी झोपायला गेल्या होत्या. मात्र खोली क्रमांक सी-१ मधील आठही विद्यार्थीनी या शेजारच्या रूममध्ये गेल्या काही दिवसांपासून झोपायला जात होते. त्यांचे सर्व सामान त्यांना दिलेल्या सी-१ मध्ये ठेवले असल्याने दि.१ मार्च रोजी सकाळी सव्वासहा ते साडेसहा वाजेच्या दरम्यान या मुली आपल्या खोलीतील टूथब्रश व इतर आंघोळीचे साहित्य घ्यायला आल्या असतांना त्यांना उषा लाहीऱ्या वसावे (वय १३) ही छताला ओढणीच्या साहय्याने गळफास घेऊन लटकलेल्या अवस्थेत आढळून आली. मुलींनी याबाबतची माहिती अधिक्षिका व इतर कर्मचाऱ्यांना दिल्यानंतर संपूर्ण वसतीगृहात भीतीचे वातावरण निर्माण झाले. घटनेबाबत माहिती केंद्रीय आश्रम शाळेचे मुख्याध्यापक विनोद पाटील व महिला वसतिगृह अधीक्षिका आकांक्षा देवी यांनी पोलिस व प्रकल्प अधिकारी नंदुरबार चंद्रकांत पवार यांना दिली. घटनास्थळी उपविभागीय पोलीस अधीक्षक दत्ता पवार, **(पान ८ वर)**

## तालुका काँग्रेसतर्फे उद्या महायुती सरकारच्या निषेधार्थ आंदोलन

**धुळे, दि.१- भाजपाच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारच्या काळात महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची दुर्दशा दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे. राज्यातील भाजप युतीचे सरकार शेतकरी विरोधी आणि भांडवलदारधार्जिणे आहे. शेतकऱ्यांना हमीभावापेक्षा कमी भावात ४ हजार रुपये क्विंटलने सोयाबीन विकावे लागत आहे. कांदा, हरभरा, कापूस या पिकांनाही भाव नाही. आता शेतकऱ्यांची तूर बाजारात येत आहे. तर केंद्र सरकारने ऑस्ट्रेलियातून तूर आयात करण्याचा निर्णय घेतला आहे.**

भाजपा सरकारच्या या निर्णयामुळे शेतकऱ्यांच्या तुरीला भाव मिळणार नाही. शेतकऱ्यांच्या आजच्या स्थितीला सरकार जबाबदार आहे. महायुतीने निवडणूकीत शेतकऱ्यांना कर्जमाफी करण्याचे आश्वासन दिले होते. त्याची अंमलबजावणी करण्यासाठी कोणत्याही प्रकारची कार्यवाही दिसत नाही. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या आदेशानुसार महायुती सरकारच्या या शेतकरी विरोधी भूमिकेचा निषेध करण्यासाठी **(पान ८ वर)**

## पवित्र रमजान महिन्यास प्रारंभ

धुळे, दि.१- चंद्रदर्शन झाल्यानंतर पवित्र रमजान महिन्याचा प्रारंभ होतो. हिजरी सन १४४६ या वर्षातील रमजानचा प्रथम रोजा रविवारी २ मार्च पासून सुरु होत आहे. धर्मशास्त्रानुसार दिवसाची सुरुवात सायंकाळीच होते. रमजान महिन्यात दिव्य कुरआनचे शुभावतरण झाले आहे. म्हणून या महिन्याचे अनन्यसाधारण महत्व, लाभ आणि पुण्य आहे. रात्री तराविहची नमाज असते. यावेळी कुरआनचे पठण व श्रवण केले जाते. पहाटे रोजेदार सहेरी करतात. एक रमजानच्या सहरीची वेळ सूर्योदयापूर्वी पहाटे ५ वाजून ३२ मिनिटांनी आहे. सुर्यास्तानंतर संध्याकाळी ६ वाजून ३८ मिनिटांनी रोजा इफ्तारची वेळ आहे. ३० मार्च रोजी अंतिम रोजाने रमजान महिन्याची सांगता होईल.

## ताजपुरी गावात बस स्टँडजवळ दिव्यांगाची गळफासाने आत्महत्या

**शिरपूर दि.१ (का.प्र.)- तालुक्यातील ताजपुरी येथे बस स्टँडच्या चौकात गुलमोहराच्या झाडाला शर्ट व पँटने गळफास लावून दिव्यांग व्यक्तीने आत्महत्या केली. ही घटना २८ फेब्रुवारीला रात्री साडेअकराला घडली. ज्ञानेश्वर विनायक सनेर (वय ५८) असे मृताचे नाव आहे. मित्राशी विम्याच्या पैशावरुन होणाऱ्या वादाला कंटाळून त्यांनी आत्महत्या केल्याची माहिती मुलगा प्रशांत सनेर याने थाळनेर पोलिसांना दिली.**



याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, ताजपुरी गावाच्या चौकातील बस स्टँडशेजारी झाडाला गळफास लावलेल्या अवस्थेत ज्ञानेश्वर सनेर यांचा मृतदेह किर्तनाहून परत येणाऱ्या ग्रामस्थांना आढळला. त्यांच्या कुटुंबासह नातलगांनी त्यांना उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. वैद्यकीय तपासणीत त्यांचा मृत्यू झाल्याचे **(पान ८ वर)**

## सायने येथे सिनेमा शेतात केबलच्या चोऱ्या

**धुळे, दि.१- सायने ता.धुळे येथील गावात परवा रात्री सिनेमा असल्याचा फायदा घेत चोरट्याने परिसरातील शेतांमधून अनेक लोकांच्या मोटारीच्या वायर चोरून नेल्या आहेत. याप्रकरणी पोलिसांकडून तपास होत नसल्याने लोकांनी तक्रार देण्यास कंटाळा केला आहे. गावात सिनेमा आणि शेतात चोऱ्या या प्रकाराने शेतकरी हैराण झाले आहे.**

याबाबतची अधिक माहिती अशी की किशोर मच्छिंद्र पाटील, प्रशांत पांडुरंग सांगळे यांच्या दोन मोटारींची, स्वप्निल मनोज पाटील, गुलाब दाजभाऊ पाटील, अनिल बापूराव पाटील यांच्या दोन मोटारींची, **(पान ८ वर)**

## नंदुरबारच्या कुणालनगरमध्ये चोरी पंचवीस लाखांचा ऐवज लांबविला

**नंदुरबार, दि.१ (प्रतिनिधी)- शहरातील कुणाल नगरमधील डीएसके अपार्टमेंटमध्ये चोरट्यांनी एका शिक्षिकेचे घर फोडत सोने-चांदीच्या दागिन्यांसह रोकड असा सुमारे २५ लाखांचा ऐवज लंपास केला आहे. भरदिवसा चोरीच्या घटनेने खळबळ उडाली आहे. शहर व जिल्ह्यात घरफोड्यांच्या प्रमाणात वाढ झाली असून पोलिसांच्या कार्यपध्दतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होवू लागले आहे.**

नंदुरबार शहरातील उपनगर पोलीस ठाण्यापासून २०० मीटर अंतरावर असलेल्या कुणाल नगरमधील डीएसके अपार्टमेंटमध्ये शिक्षिका अनिताबाई बापूराव पाटील यांचे घर आहे. त्या काल सकाळी शाळेत गेल्या होत्या. चोरट्यांनी नेमकी हीच संधी साधत अनिता पाटील यांच्या घराला लावलेले कुलूप कापत आत प्रवेश केला. घरातील लोखंडी कपाटाचा दरवाजा तोडून चोरट्यांनी दागिने व रोकड चोरून नेली. यामध्ये सोन्या-चांदीचे दागिने, भांडी व अडीच लाखांची रोकड असा २५ लाखांचा ऐवज लंपास केला आहे. सायंकाळी अनिता पाटील शाळेतून **(पान ८ वर)**

## अज्ञात वाहनाची धडक बुलेटस्वार जागीच ठार

धुळे, दि.१- शिंदखेडा तालुक्यातील दोंडाईचा सोनगीर रस्त्यावरील दराणे फाट्याजवळ भरधाव वेगाने जाणाऱ्या अज्ञात वाहनाने बुलेट दुचाकीला धडक दिल्याने अपघात झाला. या अपघातात बुलेटस्वाराचा गंभीर जखमी होवून ठार झाल्याची घटना घडली आहे.ज्ञानेश्वर दिलीप कुंभार यांनी दि.२८ फेब्रुवारी रोजी दिलेल्या फिर्यादीनुसार, धुळ्यातील स्वामीनारायण सोसायटी प्लॉट नं.८ येथील रितीक नारायण जगदाळे (वय २६) हा बुलेट मोटरसायकल क्र.एमएच १८/एएल-९९४४ घेवून दि.२७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी साडेपाच वाजेच्या सुमारास दराणे फाट्याजवळून जात होते. त्यावेळी भरधाव वेगाने येणाऱ्या अज्ञात वाहनाने समोरून धडक दिल्याने बुलेटवरील रितीक जगदाळे हे दुरवर फेकले गेले. या अपघातात रितीक जगदाळे यांचा गंभीर जखमी होवून जागीच मृत्यू झाला. शिंदखेडा पो-लीस स्टेशनला गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

## महापुरुषांची बदनामी करणाऱ्या कोरटकरवर कठोर कारवाई करा; नंदुरबारमध्ये संभाजी ब्रिगेड आक्रमक

**नंदुरबार, दि.१ (प्रतिनिधी)- नागपूर येथील प्रशांत कोरटकर या व्यक्तीवर महापुरुषांची बदनामी, धार्मिक भावना दुखावणे, सामाजिक व जातीय तेढ निर्माण करणे व जीवे मारण्याच्या धमकी दिल्याप्रकरणी गुन्हा दाखल करून कठोर कायदेशीर कारवाई या आशयचे निवेदन संभाजी ब्रिगेड मार्फत पोलीस अधीक्षक यांना देण्यात आले.**



संभाजी ब्रिगेड मार्फत नागपूर येथील प्रशांत कोरटकर विरुद्ध महापुरुषांच्या बदनामी करणे व धार्मिक भावना दुखवणे या संदर्भात अप्पर पोलीस अधीक्षक आशिष कांबळे यांना निवेदन देण्यात आले. नागपूर येथील प्रशांत कोरटकर या व्यक्तीने इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत यांना फोन कॉल करून छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज व मांसाहेब जिजाऊ यांच्याबददल हिणकस व गलिच्छ वक्तव्ये करून बदनामी केली आहे. तसेच संबंधित व्यक्तीने विकृत लेखक जेम्स लेन याने केलेल्या छत्रपती शिवाजी महाराज आणि मांसाहेब जिजाऊ यांच्याब्द्दलच्या अत्यंत विकृत लिखाणाचे समर्थन करून तमाम शिवप्रेमीच्या भावना दुखावल्या आहेत. मराठा समाजाला शिवीगाळ करून **(पान ८ वर)**

## हॉटेल मालकाची सात हजारांना लूट

धुळे, दि.१- शहरातील सुरत बायपास रस्त्यावरील संबोधी नगरच्या बोर्डजवळ पिस्तुल सदृश्य वस्तु डोक्याला लावून सात हजारांची रोख रक्कम बळजबरी हिसकावून नेल्याची घटना घडली आहे.संदीप तुळशिराम बैसाणे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, शहरातील प्रेम जितेंद्र शिरसाठ (वय २८) व त्याच्या सोबतच्या इतर दोघांनी संबोधी नगरच्या बोर्डजवळ संदीप बैसाणे यांना शिवीगाळ करत मारहाण केली. तसेच जीवे ठार मारण्याची धमकी दिली. यावेळी प्रेम जितेंद्र शिरसाठ याने संदीप बैसाणेंच्या डोक्याला पिस्तुल सदृश्य वस्तु लावून त्यांच्या खिशातील सात हजारांची रोख रक्कम बळजबरी हिसकावून नेली. तालुका पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल झाला.

## सातपुड्यातील ऊस तोड कामगारांना ठेकेदाराने डांबून ठेवले दोघा संशयितांकडून अन्याय; सुटकेसाठी प्रशासनाला निवेदन

**नंदुरबार, दि.१ (प्रतिनिधी)- सातपुड्यातील ऊस तोड कामगारांना हंगाम संपल्यानंतरही इतर ठिकाणी ऊस तोडीसाठी नेत सुमारे ९५ मजूरांना डांबण्यात आल्याचा प्रकार समोर आला असून ऊसतोड कामगारांची सुटका करण्यात यावी, यासाठी नंदुरबार जिल्हाधिकारी व पोलिस अधिक्षक यांना निवेदन देण्यात आले आहे.**

याबाबत अक्राणी तालुक्यातील सिरसाणी येथील सायसिंग गुलाबसिंग वळवी यांनी तक्रार दिली असून मजूरांची सुटका करण्याची मागणी निवेदनातून केली आहे. प्रशासनाला दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सातपुड्यातील अक्राणी तालुक्यातील बिजरी, सिरसाणी, चुतवड, कुंबी, खुषगव्हाण येथील ऊसतोड कामगार सातारा जिल्ह्यातील उपादेव साखर कारखान्याच्या ऊस तोडीसाठी सोमनाथ गणपत दोंगेकर, संतोष करसे (दोन्ही रा.सांगवी, ता.फलटण, जि.सातारा) यांच्यामार्फत ऊस तोड कामगार मुकादम दिलीप रामजी वळवी, निंबा दमण्या वस-ावे, गणेश देवला पाडवी, पिंट्या बामण्या पाडवी, विलास रुपा वळवी व ९५ ऊसतोड कामगार हे पंढरपूर तालुक्यातील मौजे पिंपरी (नाजरे) व मौजे कतवडवाडी (ता.बारामती) पुणे येथे ऊस तोडीसाठी गेले होते. ऊस तोड पूर्ण झाल्यावरही तसेच कारखान्याच्या हंगाम संपल्यानंतरही संशयीत दोघांनी मजूरांना आपल्या गावी परत पाठविले नाही. तसेच सातपुड्यातील ऊस तोड कामगारांना इतर ठिकाणी नेत जबरदस्तीने ऊस तोड करायला लावत आहेत. **(पान ८ वर)**


**०१ रोजा ०२**

| २ मार्च २४ | ३ मार्च २४ |
|---|---|
| इफ्तार | सहेरी |
| ६.३८ | ५.३१ |

**दिपक ज्वेलर्स**
सोने- 22 K -78,300 रु.+3% GST
सोने- 24 K -85,500 रु.+3% GST
चांदी- 97,500 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३


## राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन जनतेला लाभ घेण्याचे आवाहन

**धुळे, दि.१- जिल्हा न्यायालयात दि.२२ मार्च २०२५ रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. तडजोडीने प्रकरणे निकाली काढण्यासाठी सहकार्य करावे आणि लोक अदालतीमध्ये जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश,धुळे तथा विधी सेवा प्राधिकरणच्या अध्यक्षा माधुरी आनंद साहेब यांनी केले आहे.**

न्यायालयात प्रलंबित असलेली भुसंपादन प्रकरणे, मोटार अपघात प्रकरणे १३८ एन ॲक्ट खालील प्रकरणे, दिवाणी अपिल, तडजोडपात्र प्रकरणे, ग्रामपंचायतीच्या घरपट्टी बिलाच्या देयकाबाबतची वाद-पूर्व प्रकरणे, दूर संचार निगम लि., विज वितरण, राष्ट्रीयकृत बँक आणि पतसंस्था व इतर यांच्याकडील थकबाकीबाबतची वादपूर्व प्रकरणे या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये तडजोडीसाठी ठेवण्यात येणार आहेत. लोकअदालतमध्ये तडजोडीसाठी प्रकरण ठेवण्याची प्रक्रिया सुलभ व पक्षकारांच्या हिताची आहे. ज्या न्यायालयात प्रकरण प्रलंबित आहे त्या न्यायालयात अर्ज दिल्यास दोन्ही पक्षांच्या सहमतीने लोकअदालतमध्ये **(पान ८ वर)**

## हडसुणे ग्रा.पं.चा सदस्य ठेलारी अपात्र

धुळे, दि.१ - धुळे तालुक्यातील हडसुणे ग्रामपंचायतीचे सदस्य पोपट मांगु ठेलारी यांनी निवडणुक लढवितांना दिलेली माहिती लपवून ठेवली. गावातील भारत चैत्राम देवरे यांनी पोपट ठेलारींच्या सदस्यत्वाला आव्हान देत जिल्हाधिकाऱ्यांकडे ॲड. विशाल साळवे यांच्यामार्फत विवाद अर्ज दाखल केला. जिल्हाधिकाऱ्यांनी पोपट ठेलारी व भारत देवरेंचे म्हणणे ऐकुन घेतले. पोपट ठेलारींनी स्वत:विषयीची माहिती लपवून ठेवल्याने सदस्यपद अपात्र घोषित करावे याबाबत ॲड.विशाल मधुकर साळवेंनी जोरदार युक्तीवाद केला. जिल्हाधिकाऱ्यांनी दोन्ही बाजु तपासून पोपट मांगु ठेलारी यांना अपात्र **(पान ८ वर)**

## शेतकऱ्यांशी सतत संपर्कात राहणार कृषीमंत्र्यांचे ॲड.पाटलांना आश्वासन

**पढावद, दि.१ (प्रतिनिधी)- माणिकराव कोकाटे हे कृषीमंत्री झाल्यानंतर राज्यातील प्रत्येक विभागात जाऊन प्रगतीशील शेतकऱ्यांच्या बैठका घेत आहेत. यामुळे शेतीचे पुढील धोरण तयार करतांना सोपे होईल. याकरीता राज्यातील पुरस्कार प्राप्त शेतकऱ्यांच्या संघाचे अध्यक्ष कृषिभूषन ॲड.प्रकाश पाटील पढावद, राहुल पाटील चोपडा जळगाव, कृष्णा पवार कन्नड संभाजी नगर यांनी कृषीमंत्री माणिकराव कोकाटे व प्रधान सचिव कृषी विकासचंद्र रस्तोगी यांची भेट घेतली.**



यावेळी प्रकाश पाटील यांनी मांडलेल्या सुचनेनुसार त्यांनी सांगितले की, प्रत्येक विभागात आठ शेतकऱ्यांची सल्लागार समिती स्थापन केली जाईल. त्या समितीची नियमीत **(पान ८ वर)**


**Consulting Chambers**
**with following Amenities available on Rental basis**
1) well Furnished
2) Attractive Reception Hall
3) Lan
4) WiFi
5) EPBX
6) CCTV Camera
7) Seprate MSEB meter
8) Corporate Ambience
9) Attached Toilets
**Venue : Meera Hospital**
station Road, Dhule
Phone : 7972588499
visiting time : 10 am to 12 noon



# गुरुवर्य गोविंद श्रीपत पाटील माध्यमिक विद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात संपन्न

**शहादा, दि.१ (प्रतिनिधी)- तालुक्यातील परिवर्धा येथील गुरुवर्य गोविंद श्रीपत पाटील माध्यमिक विद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२४-२५ चा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष उद्धवभाई पाटील तर प्रमुख पाहुणे म्हणून परिवर्धा गावाच्या सरपंच सौ.सपनाताई शेवाळे, उपसरपंच सौ.शितलताई मोरे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष एकनाथ भाई पाटील, केंद्रप्रमुख अशोक देवरे, डॉ. किशोर अमोदकर, प्रगतीशील शेतकरी गुलालभाई पाटील, माजी विद्यार्थी लालसिंग वळवी, वसंतभाई पाटील आदी उपस्थित होते.**

याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक जगदीशभाई पाटील यांच्या हस्ते मान्यवरांचा यथोचित सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक मंडळाच्या अध्यक्षा सौ.भारती भट मॅडम यांनी करताना सांस्कृतिक मंडळातर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. तर श्रीमती जी.डी.चौधरी मॅडम यांनी माजी विद्यार्थ्यांचा परिचय करून दिला. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक जगदीशभाई पाटील यांनी आपल्या अहवाल वाचनातून संपूर्ण शैक्षणिक वर्षात शाळेतर्फे राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. यावेळी उपसरपंच सौ.शितलताई मोरे, डॉ.किशोर अमोदकर व केंद्रप्रमुख अशोक देवरे यांनी आपल्या मनोगतातून शाळेतर्फे राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांचे कौतुक करून विविध स्पर्धा परीक्षेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन उपशिक्षिका श्रीमती एस.बी.पाटील यांनी तर आभार शाळेचे ज्येष्ठ शिक्षक के. एन.पाटील यांनी मानले. यावेळी शाळेतील सर्व शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

# एच.आर. पटेल डी.फार्मसीत व्यक्तिमत्त्व विकास, आत्मपरीक्षण व उद्योजकता कार्यशाळा उत्साहात संपन्न

**शिरपूर, दि.१-शिरपूर एज्युकेशन सोसायटीच्या एच. आर. पटेल डी. फार्मसी महाविद्यालयात व्यक्तिमत्त्व विकास व जीवन संजीवनी प्रकल्प अंतर्गत व्यक्तिमत्त्व विकास, आत्मपरीक्षण व उद्योजकता या विषयांवर दोन दिवसीय कार्यशाळा यशस्वीरीत्या संपन्न झाली.**

विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासास चालना देण्यासाठी आणि जीवनशैलीत सुधारणा करण्याच्या उद्देशाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी आत्मपरीक्षणाद्वारे आपली उद्दिष्टे ओळखावीत आणि त्यादिशेने कार्य करण्याची प्रेरणा घ्यावी, असा महत्त्वपूर्ण संदेश देण्यात आला. कार्यशाळेत जळगाव येथील विभागीय प्रकल्प अधिकारी आणि इफ्रा संस्थेचे अध्यक्ष एजाज शेख यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी व्यक्तिमत्त्व विकास, आत्मपरीक्षण आणि उद्योजकता या विषयांवर सखोल व्याख्यान दिले. कार्यशाळेच्या पहिल्या दिवशी आत्मप्रतिमा, महत्त्वाकांक्षा, आत्मविश्वास, निर्णयशक्ती, सर्जनशीलता, शारीरिक स्वास्थ्य, एकाग्रता, मानसिक आरोग्य, अभिव्यक्ती, भावनिक सुरक्षितता या गुणांवर त्यांनी प्रकाश टाकला. विद्यार्थ्यांसोबत चर्चा करत त्यांच्या समस्या समजून घेण्याचा प्रयतक केला आणि त्यावर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेचे मूल्यमापन करण्यासाठी विचारप्रवर्तक प्रश्न विचारले. हे प्रश्न विद्यार्थ्यांच्या तार्किक विचारशक्ती, सर्जनशीलता आणि निर्णयक्षमतेचा आढावा घेण्यासाठी होते. विद्यार्थ्यांनी या प्रश्नांना उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. विद्यार्थ्यांनी आत्मपरीक्षण करून आपली उद्दिष्टे निश्चित करावीत आणि त्याच्या दिशेने प्रगती करावी, असा महत्त्वपूर्ण संदेश देत त्यांनी विद्यार्थ्यांना प्रेरित केले. त्यांनी असेही नमूद केले की, चुका शिकण्याचा एक भाग आहेत; त्यामुळे दोषारोपण न करता त्यातून योग्य धडा घ्यावा आणि सुधारणा करावी. ध्येय निश्चित करण्याचे महत्त्व स्पष्ट करताना त्यांनी सांगितले की, ध्येय कोणतेही असो, ते स्पष्ट आणि मोजता येण्यासारखे असावे. त्यांनी व्यक्तिमत्त्व विकासात सातत्य कसे ठेवावे, यासाठी आवश्यक असलेल्या तंत्रांची माहिती विद्यार्थ्यांना दिली.

कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. दुसऱ्या दिवशी विद्यार्थ्यांची आत्मपरीक्षण चाचणी घेण्यात आली. या चाचणीत प्रथम वर्षातील ६३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. चाचणीचे मूल्यमापन करून विद्यार्थ्यांना आत्मप्रतिमा, महत्त्वाकांक्षा, आत्मविश्वास, निर्णयशक्ती, सर्जनशीलता, अभिव्यक्ती, विधायक वृत्ती, एकाग्रता, शारीरिक स्वास्थ्य, मानसिक आरोग्य, समायोजन क्षमता व भावनिक सुरक्षितता या गुणवैशिष्ट्यांवर आधारित व्यक्तिमत्त्व मापन पत्रक देण्यात आले. विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व अति उत्तम, उत्तम, चांगले, बरे, दुर्बल अशा श्रेणींमध्ये विभागून त्यानुसार आवश्यक सुधारणा कशा कराव्यात, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांना आपली क्षमता ओळखून त्यावर काम करण्यासाठी मार्गदर्शक सल्ले देण्यात आले.

सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन कु.पूर्वा पाटील (द्वितीय वर्ष, डी. फार्मसी) यांनी केले. कार्यशाळा यशस्वी पार पाडण्यासाठी प्रा.झेड.के. खाटीक, प्रा.जे.एच. पाटील, प्रा.एम.पी. पाटील, प्रा.व्ही.व्ही. उपासनी, प्रा.पी.एस. बोरसे, मगन पावरा व महाविद्यालयातील इतर कर्मचारी यांनी प्रयत्न केले. या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासात वाढ होऊन त्यांना स्वतःच्या क्षमतांची जाणीव झाली. विद्यार्थ्यांना प्राचार्य डॉ.एस.बी. बारी व प्राचार्य डॉ.पी.बी. निनावे यांनी देऊन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा कार्यशाळांचे आयोजन महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

# डामरखेडा येथील कै.श्री.आर.जे.पाटील माध्यमिक विद्यालयात विज्ञान दिन साजरा



**शहादा, दि.१ (प्रतिनिधी) -तालुक्यातील डामरखेडा येथील कै.श्री.आर जे पाटील माध्यमिक विद्यालयात विज्ञान दिन साजरा करण्यात आला.**

या कार्यक्रमात सर्वप्रथम डॉ. सी व्ही रामन यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करत अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी किरणकुमार बुवा तर प्रमुख पाहुणे म्हणून साने गुरुजी मित्र मंडळाचे अध्यक्ष माणक चौधरी होते. जायंन्टसच्या स्मिता सोनार, आशा चौधरी, सिमा पाटील आदी उपस्थित होते. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी प्रात्यक्षिक दाखवून विज्ञानावर अनेक प्रयोग नाटीका सादर केली. यावेळी माणक चौधरी यांनी सांगीतले की, विज्ञान हे सर्वात शक्तीशाली शस्त्र आहे. त्या मुळेच माणसाचा जिवन पद्धतीत क्रांती झाली आणि जीवन आरामदायक व सोयीस्कर झाले.या वेळी प्रत्याशिक करुन दाखविणारे विद्यार्थी अश्विनी संतोष वंजारी, नेहा भगवान कोळी, सक्हो सुकलाल ठाकरे, मेघा मुकेश कोळी, कल्पना संजय वडर, मानसी गोरख खरकार व शाळेतील शिक्षिका श्रीमती सीमा रोहिदास पाटील यांचा सत्कार मान्यवरांचा हस्ते करण्यात आला. प्रास्ताविक सिमा पाटील यांनी केले तर सूत्रसंचालन महेशकुमार चौधरी व आभार संजय पाटील यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळेतील प्रतीक पाटील, गौरव माळी, दिपाली कापुरे, मनोज पाटील, किशोर सामुद्रे, शिक्षकांनी परिश्रम केलें.

# हमीभावाने तूर खरेदी नोंदणीकरीता मुदतवाढ

**धुळे- खरीप हंगाम २०२४-२०२५ साठी धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी नाफेडच्यावतीने २४ जानेवारी, २०२५ पासून तूर खरेदीसाठी शेतकरी नोंदणी सुरु झाली आहे. त्याची अंतिम मुदत २२ जानेवारी, २०२५ होती. राज्य शासनाने २२ जानेवारीपासून पुढे ३० दिवसांसाठी २४ मार्च, २०२५ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. अशी माहिती जिल्हा पणन अधिकारी आर. एस. इंगळे यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे.**

असे आहे नोंदणीचे ठिकाण- धुळे सहकारी खरेदी विक्री आणि प्रक्रिया सोसायटी लि. धुळे (९९७५८ ३३७०७), शिरपूर तालुका सहकारी खरेदी विक्री सोसायटी लि. शिरपुर, जि. धुळे (९४२२१ २३९२९), शिंदखेडा तालुका शेतकरी सहकारी संघ लि. दोंडाईचा ता. शिंदखेडा, जि. धुळे (९२८४४ २९८७७), शेतकरी सहकारी संघ लि. साक्री, ता. साक्री, जि.धुळे (९४२१८ ८५८६६), इंडिया ग्रो फार्मर्स को-ऑप सोसायटी लि. शिंगावे, ता. शिरपूर, जि.धुळे (९८५०३ ०२२६९), शेतकरी सहकारी संघ लि. नंदुरबार, ता. जि. नंदुरबार (९७६३२ ८६८६०), शहादा तालुका सहकारी खरेदी विक्री संघ लि. शहादा, ता. शहादा, जि. नंदुरबार (७७२२० १४१६५) या खरेदी विक्री केंद्रावर तुर खरेदीकरीता नोंदणी करून जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा. असे आवाहन धुळे व नंदुरबार जिल्हा पणन अधिकारी आर. एस. इंगळे यांनी केले आहे.

# साक्रीत शिवमल्लाच्या चरणी हजारो भाविक नतमस्तक



**पिंपळनेर, दि.१ (प्रतिनिधी)- साक्री तालुक्यातील पिंपळनेर नवापूररस्त्यावर असलेल्या मानव केंद्र जवळील शिवमल्ल हनुमान मंदीरात महाशिवरात्रीनिमित्त सकाळपासून विविध धार्मिक कार्यक्रमांसाठी भाविकांनी गर्दी केली. महाप्रसाद म्हणून साबुदाण्याची खिचडी, दूध, केळी वाटप करण्यात आले. मंदिर परिसरात पहाटेपासून भाविकांची मंदियाळी होती. हजारो भाविक शिवमल्लाच्या चरणी नतमस्तक झाले.**

मंदिराजवळ सकाळी यावेळी शिवमल्ल हनुमान मंदिर समितीचे विजय गांगुर्डे, रिखबचंद जैन, मयुर कासार, शिवराज गांगुर्डे, करण मराठे, पवन पाटील, प्रीतम गांगुर्डे, यतीश गांगुर्डे दीपक धायबर, नवनाथ गांगुर्डे साहेबराब गांगुर्डे, विशाल आंबेकर, पियुष कोठावदे, सौरभ बेनुस्कर, पंकज वानखेडे, अक्षय मांडोळे, भैय्या गवळे, विशाल गवळे, चेतन पगारे, दिलीप माळी, दादू पगारे, श्रीकांत पगारे, टिनू पगारे, अतुल खैरनार, मंदिरात अभिषेक आरती रोहित गवळे व चंदू गवांदे,अमोल पाटील यांनी केला.

यावेळी शिव मल्ल हनुमान उत्सव समिती, युवा संघर्ष ग्रुपचे भैय्या कोतकर, तन्मय कासार, मनिष कोठावदे, दक्ष जाधव, प्रथम भावसार, सनी भावसार, सुनील पगारे, प्रशांत पाटील, सचिन शेवाळे, दिपक अहिरे, निरंजन जगताप, अविनाश चाळसे, अरविंद पवार, क्षेत्रीय मराठा पाटील समाज मंडळ, भातोजी महाराज, पैलाड भिलाटी, मल्याच्या पाडा येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी होते.

# धुळे सीए शाखेच्यावतीने मोफत कर्करोग निदान चाचणी शिबीर



**धुळे दि.१- धुळे सीए शाखा व दातार कॅन्सर जेनेटिक्स यांच्या संयुक्त विद्यमाने सहकार्याने इझी चेक ३६० या कर्करोग निदान चाचणी शिबिराचे सत्त-ावीस फेब्रुवारी रोजी आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाचा एकूण १३५ सीए सदस्य आणि त्यांच्या कुटुंबीयांनी लाभ घेतला. विशेष म्हणजे ही चाचणी सर्व सहभागींसाठी पूर्णपणे मोफत उपलब्ध करून देण्यात आली होती.**

या उपक्रमाचे यशस्वी आयोजन धुळे सीए शाखे-ने केले. अध्यक्ष सीए सागर गर्ग, उपाध्यक्ष आणि सचिव सीए यश आंचलिया यांनी या उपक्रमाविषयी माहिती दिली. तसेच या उपक्रमाच्या आयोजनात पश्चिम विभागीय उपाध्यक्ष सीए पीयूष चांडक (नाशिक) आणि दातार कॅन्सर जेनेटिक्सचे मिलिंद यांचे बहुमोल सहकार्य लाभले. भारतात दरवर्षी पंधरा लाखांहून अधिक नव्या कर्करोगाच्या रुग्णांची नोंद होते आणि २०२० च्या जागतिक आकडेवारीनुसार दहा लाखांहून अधिक लोकांचा मृत्यू कर्करोगामुळे होतो. त्यामुळे कर्करोगाचे लवकर निदान होणे अत्यंत गरजेचे आहे. दातार कॅन्सर जेनेटिक्सने विकसित केलेली इझी चेक ३६० ही एक अत्याधुनिक रक्त-आधारित चाचणी असून, रुग्णांच्या सुरुवातीच्या टप्प्यातच कर्करोगाचे निदान करण्यास मदत करते. या उपक्रमामुळे सीए समुदायाच्या आरोग्यसुरक्षेसाठी महत्त्वपूर्ण सहाय्य मिळाले असून भविष्यातही धुळे सीए शाखा अशा समाजोपयोगी व आरोग्यविषयक उपक्रमांचे आयोजन करत राहील असा मानस धुळे सीए शाखेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.



# एस.व्ही.के.एम. फार्मसी महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा

**धुळे, दि.१- येथील एस.व्ही.के.एम. इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी येथे मराठी भाषा गौरव दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.**

हा कार्यक्रम ज्येष्ठ साहित्यिक वि. वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन प्राचार्य डॉ.समीर गोयल यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी मराठी भाषेच्या संवर्धनाची आवश्यकता आणि तिच्या साहित्यिक वारशाचे महत्त्व यावर मार्गदर्शन केले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात विद्यार्थ्यांसाठी कविता वाचन व मराठी पुस्तकांचे प्रदर्शन, विविध उपक्रम राबविण्यात आले. विद्यार्थ्यांनी मराठी भाषेच्या संवर्धनाविषयी आपले विचार प्रभावीपणे मांडले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सहाय्यक ग्रंथपाल सचिन पाटील, नायसी सनल यांनी प्रयत्न केले. ग्रंथालयात मराठी साहित्यावरील विशेष पुस्तक प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते, ज्यामध्ये नामांकित लेखकांच्या कादंबऱ्या, कथा आणि कविता संग्रह ठेवण्यात आले होते. कार्यक्रमाच्या शेवटी मराठी भाषेच्या संवर्धनासाठी आणि भविष्यात अधिक उपक्रम राबविण्याच्या संकल्पाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# जायंटस ग्रुप ऑफ छत्रपती संभाजीनगर प्राइड व भाग्यश्री फाउंडेशनतर्फे सामूहिक विवाह

**धुळे, दि.१- विवाह हा मनुष्य जीवनातील सोळा संस्कार पैकी एक अत्यंत महत्त्वाचा असा संस्कार आहे. विवाहप्रसंगी मनुष्य त्याच्या सर्व परी करण्याचा प्रयत्न करतो व अनावधानाने अनावश्यक असा खर्च करत असतो. वेळप्रसंगी कर्ज घेऊन सुद्धा विवाहाचे मोठे कार्यक्रम आयोजित केले जातात. या अनावश्यक खर्चाला मात देण्यासाठी जायंटस ग्रुप ऑफ छत्रपती संभाजी नगर प्राइडच्या व भाग्यश्री फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सामूहिक विवाहाचे आयोजन दि.३० एप्रिल अक्षय तृतीयेच्या शुभ मुहूर्तावर आयोजित करण्यात आलेले आहे.**

यामध्ये इच्छुक जोडप्यांचा सामूहिक विवाह प्रथम हिंदू धार्मिक पद्धतीने करण्यात येणार असून, जोडपे त्यांच्या पद्धतीनुसार सुद्धा विवाह करण्याची सोय करण्यात येईल. यापूर्वी वर्ष २०१८ मध्ये ५१ जोडप्यांचे तसेच २०२४ मध्ये ३३ जोडप्यांचे सामूहिक विवाह जायंटस प्राइड तर्फे यशस्वीरित्या करण्यात आला होता. वधू-वरास संसार उपयोगी लागणाऱ्या साहित्यांचे वाटप सुद्धा करण्यात येईल. यामध्ये गरीब, शेतकरी, नैसर्गिक आपत्तीग्रस्त, मजूर प्रवर्ग इत्यादीना प्राधान्य देण्यात येईल असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आलेले आहे. सर्व इच्छुक वधू वर परिवारांनी ज्यांचे लग्न संबंध जुळलेले आहेत, त्यांनी ह्या सामूहिक विवाह कार्यक्रमात आपल्या पाल्यांचा विवाह करावा असे आव्हान आयोजकांतर्फे करण्यात आले आहे. नाव नोंदणीची अंतिम तारीख ३१ मार्च आहे. अधिक माहिती व नाव नोंदणीसाठी गोपाल सारडा यांना मो.क्र.९१७२६६६७३९ किंवा सचिन चव्हाण यांना मो.क्र.७८८७८८८३९२ वर संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# आर.सी.पटेल आयएमआरडीतर्फे पाच मार्चला राष्ट्रीय कॉन्फरन्स

**शिरपूर, दि.१- आर. सी.पटेल एज्युकेशनल ट्रस्ट संचलित इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट रिसर्च अँड डेव्हलपमेंट शिरपूरतर्फे ग्लोबल बिझनेस ट्रान्सफॉर्ममेशन टेक्नोलॉजी ट्रेंड्स अँड प्रॅक्टिसेस या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय कॉन्फरन्सचे आयोजन ५ मार्च रोजी एस.एम. पटेल ऑडिटोरियम हॉलमध्ये करण्यात आले आहे.**

ही कॉन्फरन्स ऑनलाईन व ऑफलाईन या दोन्ही पद्धतींनी आयोजित केली जाईल. सदर राष्ट्रीय परिषदेचे द्वितीय वर्ष आहे. कॉन्फरन्सचे उदघाटन आणि बीजभाषण डॉ. यामिनी करमारकर (प्रोफेसर व डायरेक्टर इंटरनॅशनल इन्स्टिट्युट ऑफ प्रोफेशनल स्टडीझ देवी अहिल्या विश्वविद्यालय, इंदुर) हे करणार असून सेशन चेअर म्हणून डॉ. पराग नारखेडे (सहाय्यक प्राध्यापक एच.ओ.डी., एम.बी.ए. के. सी.ई.आय.एम.आर. जळगाव) यांना आमंत्रित करण्यात आले आहे. कॉन्फरन्सद्वारे विद्यार्थी, स्टाफ आणि संशोधक आपल्या विषयाशी संबंधित संशोधनावर आधारित पेपर सादर करतील. संशोधनाचे हे व्यासपीठ विद्यार्थ्यांना त्यांच्या क्षेत्रात नवीन दृष्टिकोन विकसित करण्याची आणि इतर तज्ञांशी संवाद साधण्याची संधी प्रदान करेल. तसेच सदर कॉन्फरन्सद्वारे संशोधनाचे आदान- प्रदान करण्यात येईल. सदर कॉन्फरन्सद्वारे कॉमर्स व मॅनेजमेंट या विषयांशी निगडित विषय जसे फायनान्स, मार्केटिंग, ह्यूमन रीसोर्स, ग्लोबल बिझनेस अँड टेक्नॉलॉजी, सप्लाय चेन अँड लॉजिस्टिक, ऑरगनायझेशनल बीएवियर, डेटा ऍनेलिटीक्स इ. विषयांवर संशोधक विद्यार्थी संवाद साधतील. सादर केलेले संशोधन प्रकल्प हे पीअर रिव्यू जर्नल्समध्ये प्रकाशित केले जातील.


प्रकाश में आज शालिमार












## शब्दकोडे क्रमांक.२१०१



**आडवे शब्द :** १.कवी 'कृष्णाजी केशव दामले' यांचे टोपणनाव ४.चौघडा ७.शिखराचे अग्र ९.सरळ स्वभावाचा ११.विष १३.तलब १५.स्वयंपाक घर १८. दुर्दम्य २०.सुकलेला २२.देश २३.सफफर २४.लहान करंदी २६.बटटा २८.कोयला २९.मडके ३१.माहीती ३२.खोटी बातमी ३३.हत्या ३५.सुट ३७.कैची ३९.बंध ४१. ठिकाण ४२.हेतु ४५.गंजा ४७.अशोक स्तंभ असलेले भारतातील ठिकाण ४९. बर्फफाळ प्रदेशात आढळणारा केसाळ प्राणी ५१.अधिकार ५२.हिस्सा ५४.स्वत:स आपण उद्देशून वापरतो तो एकवचनी शब्द ५५.दिन ५७.नदी ५८.सजीव ५९.झाडाचा मुख्य गाभा ६०.पाया **उभे शब्द :** १.दिनवाणा २.ठेका ३.विकास ५.सश्याचे आवडते खाद्य ६.पथ ८.भाल १०.ताविज १२.ऐतवार १४.ठिकाण १६.शिवाशीव पाळणारा ,उपरणे १७.गर्द १९.रूची २१.डोळ्यांत लावावयाचे एक चीज २५.वस्ती २७.सुंदर २८.देवाची अवकृपा २९.गरदन ३०.फफक्त ३१.माहीतीतला ३२.ताट ३४.मुलायम ३६.एखाद्याशी असलेली जवळीक ३७.इच्छा ३८.दम ४०.चांगला ४१.तलवार,भाले आदी हत्यारानिशी लढणारे सैनिक ४३.कुटील डाव ४४.याद-उलट लिहा ४६.जास्त नसलेले ४७.धैर्य ४८.पक्ष्यांचा कळप ५०.दरवाजा ५३.तळपायाचा उंचवटा ५६.जखम


### शब्दकोडे क्रमांक.२१०० चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सं | वि | धा | न | | पु | का | र | | उ | | मे |
| म | त | | र | स | | ठ | | चा | प | टी | |
| ती | | अ | मा | न | त | | जा | य | का | | नो |
| | स | गा | ई | | ल | ख | न | | र | व | |
| अ | व | ध | | ह | म | | व | जा | | ड | गा |
| ज | य | | न | ल | | ता | र | | पो | | था |
| ग | | का | | वा | स | ना | | का | र | क | |
| र | स | म | ला | ई | | जी | व | ल | गा | | थो |
| | दा | | ड | | का | | र | वा | | बा | बा |
| स | ब | ब | | आ | व | र | ण | | सा | | ड |
| | हा | ल | त | | ळा | | भा | ना | म | ती | |
| क | र | | न | न | | जं | त | | ना | न | क |




# शेतकरी जीवनाचे अस्सल प्रतिबिंब – ईन मीन तीन बिघे

पुण्याच्या आर्ष पब्लिकेशनच्या वतीने श्री. दिलीप भावसार यांची नुकतीच प्रसिद्ध झालेली कादंबरी म्हणजे ईन मीन तीन बिघे ही होय. यापूर्वी त्यांच्या जिव्हार, गोबड आणि जिताड या कादंबऱ्या येऊन गेल्या आहेत. दिलीप भावसार हे एक संवेदनशील लेखक असून त्यांच्या कादंबऱ्यांनी वाचकांना अंतर्मुख करण्याचा सशक्त प्रयत्न केला आहे. आपल्या आजूबाजूचा परिसर, त्यात वावरणारी माणसे, ग्रामीण–मध्यमवर्गीय जीवन हे त्यांच्या कादंबऱ्यांचे मुख्य विषय असून त्यात वेळोवेळी घडणाऱ्या घटना, प्रसंगाचे मर्मग्राही साकार चित्रण करण्यात त्यांना अमाप यश प्राप्त झाले आहे. त्यांच्या कादंबऱ्यातील व्यक्तिरेखा ह्यातर जणू आपल्याशी संवाद साधताहेत असेच वाटत राहते. किंबहुना यामुळेच त्यांच्या कादंबऱ्यांनी मराठी साहित्य क्षेत्रात आपला एक वेगळाच ठसा उमटवला आहे.




दिलीप भावसार हे एक निर्मळ, प्रांजळ व्यक्तिमत्त्वाचे धनी आहेत. आयुष्यभर नगरपालिकेच्या प्रशासकीय सेवेत कार्यरत असताना त्यांना वेळोवेळी भेटलेली माणसे, नेते मंडळी आणि रोजच उद्भवणारे मनोवेधक प्रसंगांनी त्यांच्यातील संवेदनशील लेखकाला अस्वस्थ करून सोडले. तेव्हापासूनच समाजातील माणूस आणि घटना यांच्याकडे चौकस जाणीवेने बघण्याची दृष्टी त्यांना आपोआपच प्राप्त झाली. नोकरी करण्यापूर्वी विद्यावर्धिनी महाविद्यालयासारख्या चळवळ आणि आंदोलनांना समजून त्यांना दिशा देणाऱ्या महाविद्यालयात शिक्षण घेतल्यामुळे त्यांच्यातील संवेदनशीलतेला बळ प्राप्त झाले. विद्यावर्धिनी हे सर्वसामान्य विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारे महाविद्यालय. तेथील प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी हे यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहिलेत. त्यांच्या छायेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांवर त्यामुळेच इथल्या संस्कारांची जडण–घडण दृढपणे होत राहिली. दिलीप भावसार हे या संस्कारांचे, जाणिवांचे प्रतीक होय. त्यांनी सदैव आपली लेखणी ही सर्वसामान्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पाजळली. सर्वसामान्यांचा आक्रोश, त्यांचा जीवन–संघर्ष आणि त्यासाठीचे दिशा–दर्शनासाठी त्यांच्या कादंबऱ्या मार्गदर्शक ठरल्या आहेत. त्या दिशेने सुरू असलेले त्यांचे लेखन भविष्यात सर्वसामान्यांसाठी अधिक मोलाचे ठरणार आहे.

ईन मीन तीन बिघे ही दिलीप भावसार यांची कादंबरी ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या जीवनाशी संबंधित अशी आहे. शेतकऱ्यांच्या समस्या–प्रश्न हे आजही निर्णायकपणे सुटू शकलेले नाहीत. आजही त्यांना आपल्या न्याय मागण्यांसाठी आंदोलने करावी लागतात. नुकतेच शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांवरून पुन्हा दुसऱ्यांदा दिल्लीच्या विविध सीमारेषेवर आंदोलन सुरू झाले आहे. गेले वर्षभर ते सुरूच आहे. या आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांची मागणी आहे– एमएसपी अर्थात् कृषी मालाच्या आधारभूत किमती जाहीर करणे, त्या संदर्भातला कायदा लागू करणे, शेतमजुरांची कर्जमाफी करणे, शेतकऱ्यांचीही कर्जमाफी करणे, देशभरातील पीक विमा योजना आणि त्यातील त्रुटी दूर करणे, आदिवासींसाठी घटनेतील अनुसूची पाच मध्ये योग्य ती दखल घेणे आणि नरेगाच्या माध्यमातून शंभर दिवसांच्या ऐवजी दोनशे दिवसांच्या रोजगाराची गॅरंटी देणे या प्रमुख मागण्यांसाठी आता शेतकरी शंभू बॉर्डरवर जमले आहेत. शेतकरी एका भयंकर कोंडीत सापडला आहे. सरकारकडून त्यांना फक्त आश्वासनं मिळतात पण न्याय मात्र मिळत नाही.

तीन दशकांपूर्वी जगात जागतिकीकरणाची लाट आली. यामुळे शेतकऱ्यांच्या जीवनात आशेचा किरण निर्माण झाला. त्यांना वाटले की यामुळे कृषी उत्पादनात वाढ होईल आणि शेती क्षेत्रातही बदल होईल. आणि झाले ही तसे– शेती क्षेत्रात परकीयांची गुंतवणूक वाढली, बहुराष्ट्रीय कंपन्यांचा प्रवेश वाढला; पैशांच्या आर्थिक व्यवहाराला मोठे महत्त्व प्राप्त झाले. परंतु यामुळे एक गोष्ट झाली आणि ती म्हणजे शेतकऱ्यांच्या कुटुंब व्यवस्थेवर मोठा आघात झाला. दिलीप भावसारांनी ईन मीन तीन बिघे या कादंबरीत शेतकरी परिवारांवर होणाऱ्या या आघातांचे वास्तववादी चित्रण केले आहे. स्वतः त्यांनी याबद्दल भाष्य करताना म्हटले आहे की, खेड्यात नातेवाईकांमध्ये शेती मातीच्या अनुषंगाने होणाऱ्या चर्चा आणि त्यात नातेसंबंधांपेक्षा पैशाला, व्यवहाराला दिले जाणारे महत्त्व मला अस्वस्थ करत गेलं. अनंत अडचणी सोसत आधीच्या पिढ्यांनी जमीन राखली पण नव्या पिढीची जमिनीत आणि नात्यांमध्ये ही भावनिक गुंतवणूक नसल्यासारखी मला दिसत गेली. मी याचा अधिक खोलवर जाऊन शोध घेतल्यावर अधिकाधिक अस्वस्थता येत गेली आणि ही कादंबरी आपोआपच आकाराला आली. जागतिकीकरणामुळे काळ एवढा बदलला की विकासा ऐवजी तोटे अधिक दिसू लागले. यामुळे असमानता वाढली. भ्रष्टाचार वाढला, सार्वभौमत्व कमी झाले. सांस्कृतिक ओळख नष्ट होऊ लागली, पर्यावरणाचा ऱ्हास होऊ लागला, बेरोजगारी वाढली, स्थानिक नोकऱ्या कमी झाल्या, बहुराष्ट्रीय कंपन्या आल्यामुळे स्थानिक व्यवसाय बंद पडू लागले आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे शेतकरी परिवार, शेतकऱ्यांचे कुटुंब व्यवस्था मोडकळीला आली.

ईन मीन तीन बिघेत आपल्याला दिसते की माणसामाणसांमधील नातेसंबंध हे केवळ औपचारिक रित्या उरलेले आहेत; त्यांच्यात अनेक प्रकारचे गुंते निर्माण झाले आहेत. पूर्वी शेतकरी आपल्या शेतीला–मातीला आई म्हणून पुजायचा. त्याची अत्यंत खोलवर असलेली श्रद्धा, निष्ठा, प्रेम त्याच्या वागण्या–बोलण्यातून व्यक्त व्हायची. ती या बदलामुळे संपुष्टात येत चालले आहे. कादंबरीत रामलाल साखरे म्हणजे मोठे बाबा आणि लक्ष्मण साखरे म्हणजे लहान बाबा यांच्या परिवाराची कहाणी आहे. मोठे बाबांना बदलाभाऊ, पन्नालाल, नलुताई आणि रतिलाल अशी चार अपत्य आहेत तर लहान बाबांना धनालाल, बदलीताई, सुकलाल, निंबालाल, बाबुलाल, कमळीताई आणि नंदलाल अशी सात अपत्ये आहेत. मोठे बाबा व लहान बाबा या बंधूंनी कधीही आपला संयुक्त परिवार तुटू दिला नाही; भांडणं होऊ दिली नाहीत. परिवार नेहमी अखंड रहावा म्हणून मुलांच्या दुधाची अदलाबदल करून मुले जगवलीत. त्यांच्यात बंधुभाव वाढावा; तो कायम राहावा यासाठी प्रयत्न केलेत. परिवार अखंड राहावा म्हणून एकमेकांच्या मताचा आदर केला. परिवारात येणाऱ्या अडी–अडचणी, सुख–दुःख, संकटं आपलेपणाने सर्व मिळून सोडवलीत. एकमेकांच्या मुलांना शिकण्यासाठी सर्व मिळून खर्च केला. साठ बिघे असलेली जमीन हळूहळू मुला–मुलींचे लग्न, आणि कर्ज फेडणीत कमी कमी होत फक्त साडेतीन बिघे उरली. दोघे भाऊ गेल्यानंतर मोठ्या भावाचा मुलगा बदलाभाऊ धनाभाऊ च्या नावावर जमीन एकमताने केली. कुणाच्याही मनात त्यावेळी शंकाकुशंका आल्या नाहीत परंतु पुढे जागतिकीकरणाच्या रेटात जमीन विकून टाकावी या मताला सर्वजण आलेत. लहान बाबांचा मुलगा निंबालाल साखरे हा त्या कुटुंबातला पहिला शिक्षित मुलगा. शिक्षक म्हणून नोकरी केली. शिकलेला आहे म्हणून सर्वजण त्याचा मान राखीत. तोच सर्वांच्या समस्या सोडवायचा. जमीन विक्रीचा प्रश्न त्याच्या समोर आल्यानंतर तो एकेका भावा–बहिणींना जाऊन भेटतो. त्यांची मते जाणून घ्यायचा प्रयत्न करतो. त्यावेळी त्यांच्यातील बदल कादंबरीत अत्यंत सशक्तपणे चित्रित झाले आहेत. त्यांचीही इच्छा असते की परिवार तुटू नये, एकमेकांची नातेसंबंध बिघडू नयेत किंबहुना ते अधिक दृढ व्हावेत यासाठी प्रयत्न करतो. शेत आपल्या भावंडातच राहावं यासाठी प्रयत्नाची शिकस्त करतो. परंतु बदललेल्या परिस्थितीचा अंदाज घेण्यात त्याला पुरेसं यश प्राप्त होत नाही. शेत विक्री–खरेदी करणारे एजंट यांचा शेत विक्रीसाठी लागलेला ससेमिरा तो थोपवू शकत नाही. कारण परिवारातली उच्चशिक्षित मोठ्या शहरात, विदेशात नोकरी करणारी पिढी मात्र काळानुरूप व्यवहार करते. कुटुंब दुभंगण्याचे हे प्रसंग मनाला चटका लावून जातात. ईन मीन तीन बिघे कादंबरीचे निवेदक निंबालाल साखरे आपल्या परिवाराची ही कथा सांगताना नातेसंबंधांना कशी अवकळा आली आहे आणि शेतीशी संबंधित माणसं जमीन, नद्या, डोंगर, पशुपक्षी, प्राणी या सर्वांकडे कुठल्या नजरेने बघतात याचे मर्मग्राही चित्रण करतो. जागतिकीकरणाच्या रेट्यात गरीब अधिक गरीब, श्रीमंत अधिक श्रीमंत होत चालल्याचे दिसत आहे. भांडवलदारी वृत्ती आपल्याला आपल्या रूढी–परंपरा, संस्कृतीला कशा गिळंकृत करत चालल्याचेही चित्रण प्रभाविरित्या होताना दिसते. मानवी मूल्यांना काहीच अर्थ उरलेला नाही असेही दिसून येते. केवळ व्यवहारवादी वृत्ती आणि नातेसंबंधातला शुष्क कोरडेपणा उरल्याची आपल्याला जाणवत राहते. लेखक दिलीप भावसारांनी या संपूर्ण जीवन–व्यवहाराचं चित्रण अनेक घटना प्रसंगातून जणू आपल्यासमोर, आपल्याला समजेल असं घडतं आहे या शैलीत केले आहे. त्यांची ही शैली वास्तववादी आहे; यथार्थ आहे. त्यामुळेच ही कादंबरी वाचताना आपण स्वतःला केव्हा हरवून बसतो हे ही कळत नाही.

---

# मराठीच्या बोली आणि बोलीभाषांमधील विविधता

**अनिल विद्याधर आठलेकर**

चाय मांड वं...
चहा ठेव गं...
च्याय कर गो...

भाषा कोणतीही असो, प्रदेश कोणताही असो, घराघरात ऐकू येणारा हा हवाहवासा संवाद. कुणी मांड म्हणेल, कुणी टाक म्हणेल कुणी ठेव म्हणेल तर कुणी कर म्हणेल पण चहा होईल म्हणजे होईलच. चहा..! दोन अक्षरांत किती जादू आहे! नाव घेतलं तरी तरतरी येते. सामान्य शेतकर्याचपासून ते अगदी राजकारण्यांपर्यंत, गरिबातल्या गरिबापासून ते अगदी गर्भश्रीमंत माणसापर्यंत सर्वांच्या घरी तितक्याच आवडीने आणि सहजतेने वावरणारा घटक म्हणजे चहा. शब्द वेगवेगळे असतील पण भावना मात्र तीच, किंबहुना अनुभवही तोच. हीच भाषेची गंमत आहे.

भाषा हे माणसाला मिळालेलं वरदानच आहे असं म्हटल्यास वावगं ठरू नये. सर्व सजीवांमध्ये फक्त माणूसच भाषा बोलू शकतो, आपल्या भावना भाषेद्वारे व्यक्त करू शकतो. ही भाषा कशी निर्माण झाली याबाबत मात्र निश्चित अशी माहिती नाही. अभ्यासकांनी अनेक तर्क मांडले आहेत. ईश्वराने निर्माण केली, राजाने केली, निसर्गाकडून माणूस शिकला वगैरे वगैरे. यापैकी कोणत्याच तर्काने मात्र, भाषेची निर्मिती पुरेशा प्रमाणात स्पष्ट करू शकत नाहीत. आपल्या गरजा आणि आवश्यकता यांना अधिक प्रभावीपणे व्यक्त करण्यासाठी विचार करत असताना मनुष्याला आपल्या तोंडातील विशिष्ट पद्धतीने ध्वनि निर्माण करण्याच्या बलस्थानाचा शोध लागला असावा आणि त्यातून पुढे भाषा निर्माण झाली असावी.

आपल्या आयुष्यात भाषेचं महत्त्व अनन्यसाधारण आहे. आपली प्रत्येक कृती, आपले विचार भाषेच्या माध्यमातूनच सिद्ध होतात. सकाळी उठल्यापासून रात्री झोप येईपर्यंत किंबहुना रात्री झोपल्यावरही स्वप्नातदेखील भाषेचा वापर होत असतो. बोलता यायला लागल्यापासून ते शेवटचा श्वास घेईपर्यंत माणूस भाषा वापरत असतो. आपल्याला माहीत आहेच की माणूस हा समाजशील प्राणी आहे, त्यामुळे समाजात वावरतांना विविध लोकांशी त्याचा संपर्क, संबंध येतो आणि त्यावेळी प्रत्येक व्यक्तीशी बोलताना माणूस भाषाच वापरुन व्यवहार करत असतो.

भाषा बोलण्याची प्रत्येकाची पद्धत वेगळी असते. आवाजातील चढउतार, आरोहअवरोह,विशिष्ट हेल, खास शब्दयोजना यानुसार प्रत्येक व्यक्तीची काही वैशिष्ट्यं असतात. व्यक्ती, विभाग, प्रदेश त्याचबरोबर अनेक असे घटक असतात ज्यामुळे प्रत्येकाच्या भाषेत वेगळेपणा असतो. मराठी भाषेचाच विचार केला तर एकूण एक लाख चौरस मैल इतका मराठीच क्षेत्रविस्तार आहे आणि मराठी भाषकांची संख्या जवळपास सात कोटींहून अधिक आहे. भाषा साधारणपणे बारा कोसांवर बदलते. कारण, भाषा ही सतत बदलत राहणारी गोष्ट आहे. यामुळेच दोन विविध शहरांमध्ये, गावांमध्ये राहणार्या लोकांच्या बोलण्यात तंतोतंत साम्य असत नाही. कोणत्याही प्रदेशात स्थानिक भाषाभेद असतातच, ते लक्षात घेता दैनंदिन व्यवहार सुरळीत व्हावेत म्हणून एका सर्वसाधारण बोलीची कोणत्याही प्रदेशाला गरज असते. अशाच प्रकारे, चांद्यायापासून बांद्यापर्यंत पसरलेल्या मराठी भाषाकांमधील व्यवहार सुरळीत व्हावेत म्हणून एक सर्वसाधारण बोली म्हणून देशी मराठी भाषेला प्रमाण भाषेचं स्थान दिलं गेलं आहे.



बोली म्हणजे तरी काय ? बोलण्यामध्ये जास्तीत जास्त साम्य आढळणार्याय व्यक्तींचा एखादा गट विशिष्टपणे वेगळा ओळखू येईल इतका जाणवू लागल्यास, त्या गटाच्या स्वाभाविक बोलण्याच्या पद्धतीला 'बोली' असं म्हणता येईल. एखादया भौगोलिक प्रदेशात किंवा संस्कृतीमधील लोकांच्या अंगवळणी पडलेले आणि मुद्दाम शिकावे न लागणारे शब्द हे बोलीमध्ये येतात. बोली मुखपरंपरेतून पुढे चालत जाते. महाराष्ट्रात साधारण पणे साठहून अधिक बोलल्या जातात. त्यात वर्हाडी, नागपुरी,हळबी, अहिराणी, डांगी आणि मालवणी अशा प्रमुख बोली मानल्या जातात. कोकणीदेखील पूर्वी मराठीची बोली मानली जात असे, पण काही जणांना ते मान्य नाही आणि आता तर कोकणी ही गोव्याची राजभाषा आहे.

बोली म्हणजे मुख्यत: प्राथमिक स्वरुपात असणारं संभाषण माध्यम असतं. लहान मुलाची वेगळी भाषा असते, शाळेत जाणार्या मुलाची वेगळी, तरुणाईची वेगळी आणि ज्येष्ठ नागरिकांचीही वेगळी. स्थल,काल,वयोमानपरत्वे हे बदल होत असतात. 'संवाद साधणे किंवा भावना व्यक्त करणे' या प्रमुख गरजेपोटी मुखावटे विविध पद्धतीने काढलेल्या ध्वनींची एक अर्थपूर्ण साखळी म्हणजे 'बोली' असं आपण म्हणू शकतो. बोलीची स्वत:ची अशी वैशिष्ट्यं असतात ती यामुळेच. प्रत्येकाची सवय, लकब आणि क्षमता वेगवेगळी असल्याने आवाजातही तो बदल जाणवतो आणि आपण त्या त्या आवाजांच्या अनुरोधाने त्या व्यक्तीला ओळखतो किंबहुना त्याचं गाव, जिल्हा किंवा राज्यही ओळखतो.

बोलींच्या आपल्या–आपल्या गुणवैशिष्ट्यांमुळे लक्षात राहणं सोपं होतं. मालवणी बोलणारा 'माका,तुका' करतो तर नागपुरी बोलणारा 'मले,तुले' करतो. कोणी 'बे' म्हणतं तर कोणी 'रे', कोणी 'अगं' म्हणतं तर कोणी 'अगो' म्हणतं. ही गंमत बघायची असेल तर चार–पाच विविध प्रदेशातील मित्र एकत्र भेटले की त्यांच्यात होणारा अनौपचारिक संवाद कान देऊन ऐकावा. अगदी कोणत्याही आडपडद्याशिवाय बोलली जाणारी बोली अशा मैफिलींमध्ये अनुभवायला मिळते.

आपण ना, विनाकारण आपल्याच कृतीनं आपलं साधं, सोपं आणि सुंदर जीवन उगाच क्लिष्ट आणि कुरूप करून टाकतो. नको नको ते वाद, भांडणं, भेदाभेद आणतो आणि अस्सल सोन्याची माती करतो. भाषा हे सोनं आहे आणि बोली म्हणजे त्या सोन्याची झळाळी. हे लक्षात न घेता 'प्रमाण' श्रेष्ठ की 'बोली' श्रेष्ठ असे काहीही गरज आणि आधार नसलेले वाद करत–उकरत बसतो. भाषा ही कोणत्याही एका विशिष्ट वर्गाची मालकी नसते. भाषा सर्व 'ती बोलणार्याघ आणि बोलता येणार्या व्यक्तींची' असते. त्यामुळे मग त्यात श्रेष्ठ कनिष्ठ असा भेद उद्भवतच नाही. आपण डोळे उघडून बघतच नाही आणि आंधळेपणा हा आपला आजार असल्याचं निदान आपणच करून बसतो. डोळे उघडून बघा, जग सुंदर आहे आणि हे सुंदर जग भाषेच्या माध्यमातून तुम्ही अनुभवू शकता. विविध परदेशांतील लोकांना भेटा, त्यांच्याशी बोला. त्यांची भाषा वेगळी असेल, ती समजून घेण्याचा प्रयत्न करा. शब्द कळले नाहीत तरी त्यातील आवाजावरून मथितार्थ नक्की लक्षात येईल आणि मग तुम्ही त्या भाषेच्या, लोकांच्या प्रेमात पडाल. एकदा असे डोळसपणे प्रेमात पडलात की जग सुंदर असल्याचं तुम्हाला नक्की जाणवेल.

बोली म्हटलं की आपल्याला 'इरसालपणा' आठवतो. साहित्यातूनही या बोलींना अनेक लेखकांनी अमर केलं आहे. श्री.म.माटे, बहिणाबाई चौधरी, ग.दि. आणि व्यंकटेश माडगूळकर, द.मा.मिरासदार,शंकर पाटील, आनंद यादव, रा.रं.बोराडे, उद्धव शेळके, गंगाराम गव्हाणकर यांच्यासह अगदी पु.ल.देशपांडे, बा.भ.बोरकर यांनीही या ना त्या प्रकारे बोली मुख्य प्रवाहात आणली. पु.ल. देशपांडे यांचा अनुनासिक कोकणी बाजाची मराठी बोलणारा अंतु बर्वा असो, कर्नाटक महाराष्ट्र सीमाभागातील कानडी प्रभावाखाली असणारी मराठी बोलणारे रावसाहेब आपल्याला आवडतात आणि लक्षातही राहतात. बोरकरांनी गोमंतकीय कोंकणी भाषेत लिहिलेली 'तुजिं गो पांयजणां' आजही जवळजवळ प्रत्येक मराठी रसिकाच्या हृदयात आहे. भाषा कधीच भेद करत नाही, भेद माणसं करतात. भाषा काय करत असेल तर ते 'जोडण्याचं काम' करते, भाषा दोन संस्कृती जोडते, दोन प्रदेश जोडते, दोन मनं जोडते. बोलीच्या निर्मितीची कारणं अनेक असू शकतात जशी की विशिष्ट भूभाग आणि इतर उर्वरित भाग यांच्यात दळणवळणाची साधने नसणे, दुष्काळ किंवा अन्य नैसर्गिक आपत्तींमुळे झालेली स्थलांतरं,सत्तांतरं, राजकीय हस्तक्षेप, युद्धप्रसंगांमुळे झालेल्या निर्वासितांच्या समस्या, व्यवसाय, लिंगभेद, सांस्कृतिक सामाजिक दर्जा, भौगोलिक परिस्थिती, वैवाहिक नातेसंबंध त्याचप्रमाणे विविध कारणांमुळे होणारे पर्यटन, प्रवास इत्यादी गोष्टींमुळे बोलींमध्ये विविधता येत जाते.

महत्त्वाची गोष्ट ही आहे की प्रमाणभाषा आणि बोली यांचा खूप जवळचा संबंध आहे. खरंतर, प्रमाण आणि बोली एकमेकांना पूरक आहेत. प्रमाणभाषेला अनेक नव्या शब्दांची देणगी बोलीकडूनच मिळते तर प्रमाण भाषेतून जवळजवळ अदृश्य झालेले शब्द बोली भाषाच जपून ठेवते, जिवंत ठेवते. या अर्थी, बोली ही एक अत्यंत जिवंत भाषापद्धती आहे. प्रमाण भाषेला एक चौकट असते, त्या चौकटीत तिला वागणं क्रमप्राप्त असतं, पण बोलीचं तसं नाही. बोली स्वयंभू असते, स्वतंत्र असते. बोलीला वेगळी लिपीदेखील नसते, कारण ती सामान्यातल्या सामान्य माणसाच्या मनाची भाषा असते. लोकांनी लोकांसाठी जगवलेली व जपून ठेवलेली लोकांची भाषा म्हणजे बोली. शिव्या असोत की ओव्या, बोलीत त्या अमृतासारख्या वाटतात, कारण त्यातला भाव शुद्ध असतो. प्रमाण भाषा ही शासनव्यवहार तसेच इतर राज्यांतर्गत व्यवहार सुरळीत व सुलभ व्हावेत म्हणून निश्चितच गरजेची आहे. त्यामुळे तिच्याबद्दल आकस वा गैरसमज असण्याचं कोणतंही कारण नाही. बोलीला उत्तम म्हणण्यासाठी प्रमाण भाषा वाईट म्हणण्याची गरजच नाही मुळी. दोघांचंही स्वतंत्र सहअस्तित्व मान्य केलं की वादाचं रूपांतर सुसंवादात होतं आणि हे एक प्रकारे माध्यमांतर शक्य होतं ते भाषेमुळेच.

आज माणुसकी हरवत चाललेल्या काळात अस्सल जगण्याची ओळख असणार्याह बोलीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. बोलीकडून तिचं शुद्ध सत्व घेऊन मराठी भाषेची पताका सदैव फडकवत ठेवण्यासाठी प्रमाण भाषेचीही मदत घेऊ. मायबोली म्हणजे आईची भाषा, आईची माया करणारी भाषा. मग, आई कधी सापत्नभाव करते का? आई ही आई असते. आईच्या मायेने आपल्या पंखाखाली घेतलेल्या या सर्व बोली जपू. त्यांना मान देऊ. आपल्या बोलीत बोलणार्याप सामान्य माणसाला कमी न लेखता, त्याचा अभिमान असणारी बोली जाणून घेऊ. मराठी भाषेचा गौरव करण्यासाठी आपली मराठी भाषा किती समृद्ध आहे हे स्वत: अगोदर जाणून घेऊ आणि सर्वांना समजावून देखील सांगू. भाषा जगली तर संस्कृती जगेल आणि संस्कृती जगली तरच मानवता जगेल. म्हणूनच आपली भाषा आपणच जपू आणि तिची पालखी सदैव आपल्या खांद्यावर वाहू. 'भाषेचे भोई' होण्यात मिळणार्या समाधानाचं वर्णन करण्याचं सामर्थ्य आणखी कशातच नसेल, नाही का?

---

# आंब्याचा मोहर आणि अध्यात्म

**विकास एस. भाले**

आंब्याचा मोहर म्हणजे निसर्गाच्या चक्रातील एक महत्त्वाचा टप्पा. फेब्रुवारी–मार्च महिन्यात जेव्हा आंब्याच्या झाडांना नवा उमेद देणारा, सुवासिक मोहर फुलतो, तेव्हा तो फक्त एका गोड फळाचा संकेत नसतो, तर तो जीवनातील अनेक गूढ तत्त्वांचे प्रतीकही असतो.

मोहर आणि नवीन सुरुवात

आंब्याच्या झाडावर मोहर फुलतो, तेव्हा त्यात एक नवीन सुरुवात दडलेली असते. तो पुढील काळातील गोड आंब्यांचा प्रारंभ असतो. आपल्याही जीवनात असेच काही प्रसंग येतात, जिथे संकटांनंतर नवीन संधी निर्माण होतात. गीतेमध्ये श्रीकृष्ण अर्जुनाला सांगतात –

योग: कर्मसु कौशलम् (भगवद्गीता २.५०)

म्हणजेच कर्मात कुशलता म्हणजेच योग. संकटे आली तरी आपल्या कर्मधर्मातून नवा अध्याय सुरू करावा, हेच आंब्याच्या मोहराबरोबर शिकण्यासारखे आहे.

सुगंधाचा संदेश – सकारात्मकता आणि भक्ती. आंब्याच्या मोहराबरोबर सुगंधही येतो, जो संपूर्ण वातावरणात पसरतो. तसेच आपल्या जीवनातील सकारात्मक विचार आणि भक्तीभाव हा इतरांपर्यंत पोहोचतो का, हे महत्त्वाचे असते. श्रीकृष्ण म्हणतात –

पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति (भगवद्गीता ९.२६)

म्हणजेच, भक्तिभावाने दिलेले साधे पत्र, फूल, फळ किंवा पाणीही ईश्वर स्वीकारतो. आपल्या मनात पवित्रता आणि भक्ती असेल, तर आपल्या जीवनातील सुगंधही ईश्वरपर्यंत पोहोचतो.

फुलांचा त्याग आणि फलप्राप्ती

मोहर फुलल्यानंतर त्याचे अस्तित्व संपते, पण त्यातून फळाचा जन्म होतो. तसेच आपल्या जीवनात कधी–कधी त्याग करावा लागतो, त्यातूनच मोठे काही मिळते. गीतेत श्रीकृष्ण सांगतात –

त्यागाच्छान्तिरनन्तरम (भगवद्गीता १२.१२) त्याग केल्याशिवाय खऱ्या शांतीची प्राप्ती होत नाही. म्हणूनच मोहक मोहर गळून जाऊन गोड आंबे देतो, तशीच माणसाच्या जीवनातील प्रत्येक छोटी गोष्ट मोठ्या यशाचा मार्ग मोकळा करते.

निसर्ग आणि अध्यात्म – आत्मज्ञानाचा धडा

आंब्याचा मोहर आपल्याला निसर्गाच्या चक्रातील एक सत्य शिकवतो – नवे काही निर्माण व्हायचे असेल, तर जुन्याचा त्याग आवश्यक असतो. जीवनही तसेच आहे. ज्याला नवे घडवायचे आहे, त्याने जुन्या विचारसरणीचा त्याग करावा. गीतेत म्हटले आहे –विनाशाय च दुष्कृताम्, धर्मसंस्थापनार्थाय सम्भवामि युगे युगे (भगवद्गीता ४.८)

म्हणजेच, जे जुनाट, अनावश्यक आणि चुकीचे आहे, ते नष्ट करणे आणि नवीन उभारणी करणे हे ईश्वराचे कार्य आहे. आपणही हे तत्व अनुसरले, तर जीवनात आनंद आणि समाधान मिळवू शकतो.

निष्कर्ष– आंब्याचा मोहर म्हणजे निसर्गाचा एक चमत्कार आहे, पण त्याच वेळी तो जीवनाचे गूढ तत्वज्ञानही शिकवतो. जीवनात नवीन संधी स्वीकारा, सकारात्मकता पसरवा, त्याग करण्यास तयार राहा आणि निसर्गाच्या नियमांप्रमाणे स्वतःला घडवा. भगवद्गीतेतील शिकवणी प्रमाणे जीवनाकडे पाहिले, तर प्रत्येक मोहर आपल्याला नवी दिशा दाखवतो आणि आत्मज्ञानाकडे नेतो.



## ऐका ते खरं

नितीन अहिरराव
मो.९०९६२०४८७५

# वासुना लगननी वरात



रामराम हो मंडई , लगनसराई सुरु व्हयनी का माले मन्हा एक मित्रनी लगननी भलती याद येस , आनी त्या लगनमा येल परसंग याद करस्नी हासु भी येस , त्याच लगनन्या गमतीजमती आज तुम्हले सांगी राहिनु.

कॉलेजमा आम्हना दहा बारा मित्रस्नी ग्रुप व्हता , आम्ही बठ्ठा कॉलेजमा आनी अकाउंटना कल्लासले बरोबरच जाऊत, आनी कायम बरोबरच राहुत.

कॉलेजनं तिसर वरीस चालु व्हयन आनी आम्हना वासु नावना मित्रनं लगन जमनं , त्याना बरोबर बठ्ठा ग्रुपलेच आनन व्हयना , कारन मित्रना लगनमा मजा मस्ती कराले भेटनार व्हती , नाचाकुदानी हौस भागनार व्हती . वासुनं दुकान व्हतं आनी त्यानी लाईन मस्त बसेल व्हती म्हनीस्नी त्याले काही चिंता नव्हती पन वासुना स्वभाव थोडा विचित्र व्हता , चमडी जाये पन दमडी ना जाये हाई त्यांन तत्व व्हतं, आनी परतेक गोटमा व्यवहार देखे , पै पै ना

हिशोब जोडे .वासुनं लगन पंधरा दिनवर येल व्हतं, लगननी जोरदार तयारी चालु व्हती , तव्हय वासुनी माले सांग यार नितीन तु एक काम कर , आपला बठ्ठा मित्रस्नी यादी कर म्हनजे आपले लगननी पत्रिका देता ई आनी बठ्ठास्ले लगनले आवतान देता ई

हा , मी करस मित्रस्नी यादी , तु नको टेशंन ल्यु

मित्रस्नी यादी कर पन मैत्रीनीस्ले ईसरू नको , बठ्ठा येवाले पाहिजेत मन्हा लगनले वासु मोठाईक्या करीस्नी बोल्ना

हवं , वासु तुन्ही वरात अशी जोरदार काढसुना की बठ्ठा

लोके देखतच राहतीन मी वरातनी जबाबदारी येत बोल्नु

मी बठ्ठा मित्र मैत्रीनीस्नी यादी करी ,जवयपास चायीस पंचेचायीस नावे व्हतात यादीमा, मी ती यादी वासुले देखाडी , वासुनी ती यादी देखी आनी त्याना मनमा चलबिचल सुरू व्हयनी , त्याना चेहरावर टेशंन स्पष्ट दिखाले लागनं . मन्हावर काही -हावायन नै मी वासुले ईचार

काय रे वासु काय व्हयन, मन्हं काही चुकायनं का ?

नै रे काही नै वासु खालता मान खालीस्नी बोल्ना

वासु तुन्हा मनमा काहीतरी चाली राहिनं , काय ते बोल पटकरी . आनी ते भी खर खर बोल भो मी बोल्नु

वासुनी ती यादी हातमा लिधी आनी तो बोलाले लाग्ना

हाऊ संज्या काही कामना नै , यानं नाव कट कर, हाऊ विज्या भलता फालतु शे , यानं नाव कट कर . हाऊ अशोक राम्या , जित्या पद्या या वायबार शेतस यास्नं भी नावे कट कर . अस करत करत यादीमा फक्त चार मित्रस्ना नावे राहिनात आनी ती यादी वासुनी फायनल करी . माले वज्जी नवल वाटन की वासु अस काब्र करी राहिना , मी ती गोट तठेच ईसरी गयु एक एक दिवस असाच जाई राहिन्ता आनी आज वासुनी हयदना कार्यक्रम व्हता , आम्ही चार मित्र त्याना हयदले हजर व्हतुत आनी वासुन्या दोन बहिनी आनी बोटवर मोजायतीन इतलाच पाहुना हयदले हजर व्हतात , आम्हले चारी मित्रस्ले नवल वाटनं ,या वासुना इतला मोठा समाज धुय्यामा शे तरी कोनीच कस वुनं नै , वासुनी हयद बरीमाठी पार पडनी , पन आम्हले ती गोट भलतीच खटकनी. आम्हले वाटनं की गावमातला नातेवाईक आनी पै पाव्हना या कालदिन लगनमा ईथीन अस.

वासुना लगनना दिन उजाडना, आम्ही चार मित्र सकायमाच हजेरी लायी आनी नवरदेव सजाडाना गुंता वासुनी मदत कराले लागनुत. आंगनमा बॅन्ड वाला वुनात आनी त्यास्नी गाना वाजाडाले सुरुवात करी. मंडपमा मोजकाच डोका चमकी राहिन्तात आनी वासुना दुकानवर काम करनारा दोन तीन मजुर हजर व्हतात. नवरदेव सजीस्नी तयार व्हयना आम्ही चारी मित्र त्या सजेल वासु नवरदेवले लिस्नी आंगनमा वुनुत, घोडावाला भी तव लगुन तयार व्हयेल व्हता. नवरदेवले देखताच त्याना मायनी आनी बहिनीस्नी वासुनं औक्षन कर आनी ओवायनी टाकी .

बॅन्डवालास्नी गाना वाजाडाले सुरुवात करी आनी आम्हना मित्र वासु घोडावर बसना .घोडावर बसीस्नी त्यानी आम्हले हुकूम सोडा नाचा रे बठ्ठा जन. मंडई त्या वासुना वरातमा पाहुना, नातेवाईक कमी आनी बॅन्डवालाच जास्त व्हतात आम्ही चारी मित्र येरमेरना तोंड कडे देखाले लागनुत, आनी बयजबरी बॅन्डना तालवर नाचाले लागनुत. आम्हना डान्स देखाले कोनीच नव्हतं कसतरी वाकडं तिकडं कंबर हलावाले लागनुत आनी एकदावनी मिरवनुक मंगल कार्यालय पोहचनी. तठे भी मोजकाच डोका बसेल व्हतात नवरीना मायनी नवरदेवनं औक्षन कर आनी नटेलथटेल नवरी उनी , नवरी सुदंर आनी गोरीपान व्हती , आम्हले वासुना नशीबना हेवा वाटाले लागना कारन नवरी वासु पेक्षा बरीच उजवी व्हती. नवरी नवरदेव आमनेसामने उभा राहिनात आनी बाम्हन तात्यानी मंगलाष्टक म्हनाले सुरुवात करी एकदावनं लगन लागन, बॅन्डवालास्नी जोरमा बॅन्ड वाजाडा आनी वासुनं लगन लागनं

लगन लागताच ज्या मोजका लोके लगनले येल व्हतात त्या जेवाले निंघीगयात, नवरदेव कडे आम्ही चार मित्र, फोटोग्राफर आनी वासुन्या दोन बहिनी इतलाच लोके व्हतुत सयपाक ते भरपूर करेल व्हता पन जेवनारा लोकेच नव्हतात. फोटोग्राफर फोटो काढी राहिन्ता पन वासुनं चित्त तठे नव्हतं , त्याना डोकामा काहीतरी वेगयाच विचार चालु व्हतात. नवरी हसत हसत फोटो काढी राहिन्ती पन वासुनं ध्यान बिलकुल तठे नव्हतं शेवटी त्यानी माले आवाज दिधा आनी जोगे बलायी लिंध आनी मन्हा कानमा सांगाले लागना नितीन तु मन्हा दुकानवर ज्या मानसे काम करतसं ना त्यास्नावर ध्यान ठेव , बैना त्या बरोबर नै शेतस बर का, त्या पिशव्या भरीस्नी गुलाबजामुन घर लयी जातीन मी भी हा शी हा म्हनी दिधं आनी स्टेजवरूथुन खालता उतरी गयु.

त्या मजुर मानसे जेवन करीस्नी निंघीगयात पन माले वासुनं भलतच नवल वाटन आनी संतापभी वुना , बैना लगनमा मोजकाच डोकास्नी हजेरी लायी , ज्या वुनात त्याभी बयजबरी येल सारखा व्हतात .मंडई लगन हावु आपला जिवनमा पहिला आनन उत्सव -हास , आपन नातेवाईकस्ले, मित्र मंडई ले आरोस्तोल करीस्नी बलावतस आनी नातेवाईक, मित्र मंडई भी आपला आननमा मोठा खुशीमा सामील व्हतसं पन आपला स्वभाव कुजका , ऐकलखो-या, कंजूस राहिनाते आपला आननमा कोनीच सामील व्हस नै , वासु मित्र म्हनीस्नी कितलाभी चांगला राहु द्या पन त्याना स्वभाव भलता विचित्र व्हता पै पै ना हिशोब देखनारा आनी परतेक बाबतमा आपला फायदा देखनारा असा त्याना स्वभाव व्हता. आनी हावुच स्वभाव त्याले नडना. त्यान आनी त्याना बायकोन काही जमनं नै आनी दोन्हीस्ना खटका उडाले लागनात आनी ती बाई माहेरले निंघी गयी ती परत नांदाले उनीच नै, सहा महिनाच वासुनी फारकती व्हयनी.

आम्ही मित्रस्नी वासुले समजाडी सांग की तु तुन्हा स्वभाव बदल आनी जरा मनमोकया वागत जा अशी , पन त्याना स्वभावमा काही फरक पडना नै , त्यानी दुसरं लगन कर पन ते भी टिकनं नै , ती पोर भी याना स्वभावना पाहिरे कटाईस्नी निंघी गयी. मंडई तुम्ही पैसा कमाडा , श्रीमंत व्हा पन त्या पैसा खर्च कराले भी शिका , लोके तुम्हनाकडे कितला पैसा शेतस , तुम्हीन कितला श्रीमंत शेतस हाई देखतसं नै , तुम्हनामा कितली मानुसकी शे , तुम्हीन लोकेस्ना कितला काममा येतस हाई देखतस आनी त्या परमाने तुम्हनाशी वागतस. मंडई म्हनतस ना जित्तानी खोड मरा शिवाय जात नै तसाच वासुना स्वभाव शे , आज भी तसाच वागस , त्याना स्वभावना पाहिरे त्याना बठ्ठा मित्र आनी नातेवाईक तुटी गयात मात्र वासुले काही फरक पडना नै , तो भला आनी त्याना पैसा भला असा तो त्यानाच दुनियामा -हास . कवयमवय रस्त्यावर लागला भेटना ते रामराम करस आनी काही न बोलताच निंघी जास .

जिवलग मित्र म्हनीस्नी वाईट वाटस पन स्वभावले औषध -हास नै हाई ध्यानमा ठिस्नी मी भी ध्यान देस नै , तो त्याना दुनियामा खुष मी मन्हा दुनियामा खुष.

## हास्यगिरी

प्रा.वसंत गिरी
मो.९०११२२९२३२

# विनोद मानवी जीवनाचा अमृतकुंभ

प्रत्येक माणूस जगण्यासाठी एक विशिष्ट व्यवसाय निवडतो किंवा नोकरी करतो.त्याचा चरितार्थ चालविण्यासाठी त्याला शारीरिक किंवा बौद्धीक पातळीवर हालचाल करणे गरजेचे असते आणि त्याच्या उपजत स्वभावाप्रमाणे तो त्याच्या इप्सित स्थळी पोहचण्यात यशस्वी झाला तर तो काही कालावधीपर्यंत आनंदी राहतो.फार मोठा गड सर केल्याचा आनंद त्याला मिळतो कालांतराने तो व्यवसाय, ती नोकरी त्याला मोठीच शिक्षा वाटायला लागते.असं का होतं? पु लं देशपांडे म्हणतात या प्रश्नाचं उत्तर शोधण्यासाठी मी अनेकांच्या मुलाखती घेतल्या.

आपल्या आजारावर निदान शोधण्यासाठी प्रत्येक पेशंट ज्या डॉक्टराकडे जातो तोही निरोगी नाही हे वास्तव त्यांच्या समोर येतं.तरीपण प्रत्येकाला दुरुस्त करण्याचं नाटक त्याचं चालूच असतं.येणाऱ्या प्रत्येक रुग्णाला शारीरिक आजार कमी व मानसिक आजार अधिक हे विदारक चित्र त्यांना दिसून येतं. ज्या व्यक्तीचं विनोदाशी नातं घट्ट जुळले आहे.तो आजारी पडू शकत नाही हे मात्र खात्रीने तज्ञ डॉक्टर सुद्धा सांगतात.त्या डॉक्टरांच नातं मात्र पेशंटच्या मनाशी जुळलेले असणे जास्त महत्वाचे. त्याचं नातं जर पेशंटकडून येणाऱ्या बिलासोबत जुळलेले असेलं तर पेशंटच्या मनाशी त्याचे काही नाते असण्याचा प्रश्न येतो कुठे?अहो एखादा विनोदवीर किंवा हास्य- सम्राट जेंव्हा डॉक्टरकडे तपासनीसाठी जातो. तेंव्हा डॉक्टरचाचआजार तो बरा करतो. प्रत्येक पेशंटला डॉक्टर अगदी देवादूतासारखा वाटतो.आजार जास्त वाढल्यावर अगदी देवासारखा वाटतो.(तर बिल खूप जास्तच आल्यावर अगदी राक्षसासारखा वाटतो. बिल देईपर्यंत प्रकृती बऱ्यापैकी सुधारलेली असते, त्यानंतर पैशाची चिंता सुरु होते.) पण कोट्यावधीची कमाई करून व सर्व प्रकारची ऐहिक सुखे उपभोगून डॉक्टरांची भूमिका असते.या व्यवसायात राम नाही. अहो, राम नाही की सीता नाही,नुसता वनवास आहे. असेच निराशाजनक उद्गार ऐकायला मिळतात.

एक विनोदवीर त्याच्या सादरीकरणातून किती लोकांना हसवतो.त्यांचे दु:ख.चिंता,आजार नष्ट करतो. प्रत्येक श्रोत्याच्या दैनंनदिन जीवनातील रडगाणे नष्ट करुन त्यांना खळखळून हसवितो.त्यांना हसविणे ही सोपी गोष्ट नाहीच.लोकांना भितीग्रस्त करणे,रडविणे,चिंताग्रस्त करणे हा आसूरी उन्माद आहे.त्यासाठी मानवी मन व मानवी संस्काराची गरज नाही.एकाच वेळी कितीतरी लोकांना हसवून मानवी जीवनात हास्यसागर निर्माण करणारे हास्य सम्राट,विनोदी वक्ते व विनोदी साहित्यिक मानवी जीवनाला उत्तुंग बनवीतात,जगण्यातील दु:ख नष्ट करुन जगण्याचे नवे बळ देतात.त्यामुळे हसविणारी माणसे लोकसंग्रह करण्यात यशस्वी होऊन लोकप्रिय होतात.लोक त्यांची आतुरतेने वाट पहातात.त्यांना पहाताच किंवा त्यांचे शब्द कानावर पडताच अनेक लोकांची मने फुलून जातात,टवटवीत होतात,प्रसन्न होवून जोमाने कार्यतत्पर होतात.आयुष्यातील निराशा,दु:ख,वैफल्य झटकून टाकतात.

तरीही मनुष्य प्रवृतीची दुसरी बाजू असते. त्या प्रवृतीला या मानवी जगात चांगले काही दिसतं नाही. त्यांची अवैचारिक जडणघडण अशी काही झालेली असते,त्यामुळे त्यांचा निद्रानाश होतो. बद्ध -कोष्टता वाढते,श्वास घेणे कठीण होते,मानसिक व शारीरिक स्वास्थ बिघडून त्यांच्या जगण्यातील सकारात्मकता नष्ट होते म्हणून ते कधीच हसत नाहीत.खळखळून हसले तरी त्यांच्या पोटात चमका निघतात.त्यांचा जीव घाबरतो,श्वास बंद पडतो की काय?असे त्यांना वाटते.त्यामुळे बिचारे जीव वाचविण्यासाठी रागावून पहातात.कितीही मोठा विनोद झाला तरी हसतं नाहीत.चेहऱ्यावरची घडी आणि मनातील आढी कायम ठेवून एकेक दिवस काढतात.त्यांची आपण किव केली पाहीजे. त्यांचा जर राग केला आणि आपली तशीच अवस्था झाली तर काय करायचे ? इथे ' ये हृदयीचे ते हृदयी होणे ' महाघातक ठरू शकते.त्यामुळेच त्यांच्यातील आसूरी गुणधर्म आपल्यात उतरू नयेत यासाठी स्थितप्रज्ञ राहून अदृश्य उपेक्षा हत्याराचा प्रयोग करुन आपला बुद्धी व शक्तीसंचय वाढवीला पाहिजे. अत्यंत क्षुद्र व क्षुल्लक कारणासाठी मानसिकता बिघडवून रागावणे किंवा बलप्रयोग करणे हे अमानवीय कृत्य होय.

मनुष्याने मानवी जीवन सुखी करण्यासाठी मानवीय प्रयोग करणे खूप महत्वाचे आहे.ते विनोदी साहित्यात मिळतात.आपण चरितार्थासाठी जो व्यवसाय करतो त्यात सुखी नसणारी माणसं मोठ्या प्रमाणात दिसतात.अधिकाऱ्याल्या वाटते आपली योग्यता मंत्री होण्याची आहे.अधिकारी हा विशिष्ट खात्याच्या मंत्र्याच्या ताटाखालचे मांजर.त्याची बुद्धीमत्ता कमी असूनही अधिकारी त्याच्या हूकमाचा गुलाम.शिक्षकाला अधिकारी होण्यात खूप स्वारस्य. शिक्षकी पेशाला अर्थच काय?' मागता येत नसेल भिक तर मास्तरकी शिकं ' या विचाराचा शिक्षक किती विद्यार्थी हितदक्ष असू शकेल ? ड्रायव्हरला वाटतं यापेक्षा स्टँडवर हमाली केली असती तर किमान संध्याकाळी कुटुंबात जावून रमता आलं असतं.असे अनेक किस्से आहेतआणि प्रत्येक व्यक्ती मला या पेशात यायंच नव्हतं.यापेक्षा वेगळं बनायचं होतं या विचारानेच व्याधीग्रस्त झालेली आढळतात. त्यामुळंच तेआपल्या कामावर प्रेम करू शकतं नाही. उच्च ध्येय ही असावे ही बाब समजण्यासारखी आहे, पण जे आपल्या वाट्याला आलं त्यातील उच्चांक गाठायचाअसेलं तर त्या कामावर प्रेम करणे.त्यातीलं आनंद शोधणे महत्वाचे आहे. त्यासाठी आपल्या सर्व दु:खाकडे विनोदाने पहाता आले पाहिजे.त्या दु:खाचे उदात्तीकरण कशासाठी?विनोदी साहित्य प्रत्येकाला जगण्याचे बळ देते.त्यामुळे विनोदी साहित्यनिर्मिती अधिक प्रमाणात झाली पाहिजे.दुर्दैवाने ते प्रमाण खूपच नगण्य असल्यांच पु.ल.नी निदर्शनास आणून दिले आहे.त्यात इतर साहित्यिकांचे प्रमाण व विनोदी साहित्यिकांचे प्रमाण वाचकासमोर ठेवले आहे.

(०१) ७५ कवी (आकलनीय, अनाकलनीय व तिरस्करणीय (०२) ८०कथाकार (अक्षर-लागेल तर-शपथ छाप), (०३) ०५ गोष्टी लिहिणारे (ज्यात कोणाचे काय झाले, हे कळते असे ), (०४) ५० नाटक --कार (पडेल असून चढेल) (०५) ०५ नाटककार (प्रेक्षकप्रिय), (०६) ५० कादंबरीकार (पाचशे-पानी), (०७) १० कादंबरीकार (५० पाने तरी वाचनीय) (०८) ५० एकांकिका लेखक (स्नेहसंमेलनाप्रित्यर्थ), (०९)



२५एकांकिका - लेखक (स्त्रीपात्रविरहित),(१०) २५ एकांकिका-लेखक पुरुषात्रविरहित (११) १०० एकांकिका लेखक (सर्वविरहित), (१२) १५० एकांकिका लेखक (संपादक विरहित), (१३) २०० एकांकिका लेखक (वाचक- विरहित), (१४) ३०० एकांकिका- लेखक (प्रेक्षक- विरहित), (१५) २०० लेखिका (आजचा पदार्थ ते चिमखडे बोल), (१६) २०० लेखिका (चिमणे बोल ते उलटे सुलटे टाके) (१७) ९० लेखिका (प्रेमळ माता सौ.अमुकाबाई ते फॉरेन्स नायटिंगलचे चरित्र), (१८) ९९ लेखिका सासवापासून नातवापर्यंतचे प्रश्न लिहिणाऱ्या), (१९) १९९ लेखिका (लोकगीते, स्त्रीगीते, पाळणागीते, वारली स्त्रीया इ.इ.) (२०) लेखक शिशु वाड.मय लिहिणारे), (२१) ५०० लेखिका (शीशू-शूशू किंवा शीशी वाङमयात भर घालणाऱ्या, (२२) ०१ विनोदी लेखक या सर्व वाङमय प्रकाराची बेरीज केल्यास. त्यांच्या मिश्किल नोंदीप्रमाणे सुमारे शेकडा बाराशे साहित्यिकांत एक विनोदी लेखक सापडतो. एका दिग्गज विनोदी साहित्यसम्राटाचे हे निरिक्षण खूप चिंतनीय आहे. त्यात सकस विनोदी साहित्य किती प्रमाणात? या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर शोधणे कठीणच. काही वेळा असा विचार मनात येतो. विनोदी साहित्य निर्मिती श्री.कृ कोल्हटकर,चि वि जोशी,आ.अत्रे, पु ल देशपांडे,द.मा. मिरासदार, शंकर पाटील यांच्यासोबतच संपत चालले की काय? हा प्रश्न सूज्ञ वाचकासमोर निर्माण होतो.काही विनोदी मालिका हल्लीच्या काळात ते काम करत आहेत,हे मान्य करुनही त्यातील विनोदाच्या दर्जा- विषयी काय बोलावे? हसविण्यासाठी विवस्त्र होणारी माणसं घराला घरपणं देवू शकतात का? हा आज अस्वस्थ करणारा प्रश्न आहे.तसे अस्वस्थ करणारे असंख्य प्रश्न आहेत पण इथे आपल्याला विनोद विषयाच्या संदर्भानेच विचार करायचा आहे. विनोद व विनोदी साहित्य समजण्यास विनोद बुद्धी असावी लागते.तेव्हांच विनोदनिर्मिती होवू शकते. अन्यथा ... समोर गिता वाचू नये असे म्हणतात. निर्बुद्धासमोर विनोद केल्यास कोणता भिषण प्रसंग ओढावेल हे सांगता येत नाही.पण समाजमन उन्नत करुन मानवी जीवनाचा दर्जा वाढविण्यासाठी,मानवी जीवनातील रानटीअवस्था संपवून दिलखुलास जगण्यासाठी विनोदाचे मानवी जीवनामधील स्थान अमूल्य आहे.हे ज्या दिवशी आपल्या आजूबाजूला वावरणाऱ्या ५० पेक्षा जास्त लोकांना कळेल,म्हणजे विनोद जाणणारा वर्ग बहुसंख्यांक असेल.तेंव्हा मानवी जीवन जगणे बरेच सुसह्य होईल.त्यासाठी विनोद हा मानवी जीवनाचा अमृतकुंभ वाढीस लागला पाहिजे.

## वाचाल तर वाचाल


प्राचार्य डॉ.संजीव गिरासे
मो.९३२५५३४५११

# बिन पगारी शिक्षकाच्या वेदनांचे दाहक चित्रण : बिनपगारी मास्तर

सुरेश मोरे यांची १९९ पृष्ठांची बिन पगारी मास्तर या आकर्षक शीर्षकाची कादंबरी गौरव साहित्य आलय सोलापूर यांनी प्रकाशित केलेली आहे. त्याचे प्रकाशन दोन मार्च रोजी होत आहे. त्यानिमित्ताने या कादंबरीवर परिचयवजा भाष्य इथे मांडत आहे.

कादंबरीकार सुरेश मोरे यांनी त्यांची आई स्व. शकुंतला मनसाराम मोरे यांना ही कादंबरी अर्पण केलेली आहे. शिवाय त्यांचे जेष्ठ बंधू कविवर्य स्व. शिवाजी कौतिक मोरे यांना देखील ते ही कादंबरी अर्पण करतात. 'बिनपगारी मास्तर' या शीर्षकावरूनच कादंबरीचा लेखन आशय प्रतिध्वनीत होतो. आजच्या शिक्षण व्यवस्थेचे वास्तव कथन करणारी 'बिनपगारी मास्तर' ही कादंबरी वाचकाचे मनोरंजनासह आजच्या गलिच्छ शिक्षण व शासकीय व्यवस्थेची धिंड काढते. लेखकाने नेहमीच सामाजिक बांधिलकी जपली पाहिजे. शिवाय प्रस्तावनेत सुभाष अहिरे म्हणतात, ' लेखन ही एक सत्य आणि वास्तव निदर्शनास आणणारी आणि निरंतर चालणारी ज्ञान प्रक्रिया आहे. त्यातूनच शिक्षणसेवकाचे जगणं आणि उद्भवलेल्या प्रसंगानुरूप त्याचं वागणं हा देखील लेखनाचा विषय होऊ शकतो त्यातूनच बिनपगारी मास्तर हे कादंबरी आकारत जाते.' तर दोन शब्द यातून डॉ. फुला बागुल म्हणतात, 'विनाअनुदानित तत्त्वावरील शिक्षण प्रक्रियेने होतकरू शिक्षकांचे स्वप्न कसे उध्वस्त केले, विना पगारी काम करणाऱ्या शिक्षकांचे कुटुंब कसे बाधित झाले, याचे सक्षम चित्रण ही कादंबरी करते' खरंतर ' बिनपगारी मास्तर' ही कादंबरी वगनाट्याप्रमाणे कथानकाची एक एक लढ उलगडत जाते आणि सहजपणे वाचकाच्या मनाला भुरळ घालते.

जाखेड गाव हे डोंगर रांगातलं एक गाव. घनदाट अरण्य चौफेर असल्याने इथे भट्या दरोडेखोर हा नेहमीप्रमाणे दुष्ट, लोभी सावकारांच्या घरावर दरोडा टाकतो. त्याला सर्व बातमी पोहोचविण्याचे काम सखाराम करतो. सखारामची मुलगी कलावती हिचा मुलगा नवल पाखंडे हा डॉक्टर होतो. तो पुढे शिक्षण संस्था काढतो. या संस्थेच्या मार्फत आश्रम शाळा सुरू करतो. शासनाने ही आश्रम शाळेला कायमस्वरूपी विनाअनुदान तत्त्वावर मान्यता दिलेली आहे. आश्रमशाळा म्हणजे माध्यमिक विद्यालय. इथे बेरोजगार शिक्षकांना कायम करण्याचे खोटे आश्वासन नवल पाखंडे नेहमी देत असतो आणि त्यांचे आर्थिक, मानसिक व शारीरिक शोषण करत असतो. नवल पाखंडे हा त्याच्या कर्मचाऱ्यांचे शोषण करतो, झुलवत ठेवतो आणि त्याच्या जवळच्या नातलगांमध्ये भांडणे लावायची कामे देखील करत असतो. या कादंबरीत दोन प्रमुख पात्रे म्हणजे हरेश आणि शशी हे शिक्षक शोषणाचे बळी ठरतात. राजकीय तथा न्यायालयाचे भ्रष्ट अधिकाऱ्यांची कृष्णकृती ही कादंबरी स्पष्ट करते. त्यात संस्थाध्यक्षांनी मांडलेला खेळही परखडपणे




लेखक मांडतो. ग्रामीण भागातील श्रद्धा, अंधश्रद्धा ही वास्तव पातळीवर लेखक रेखाटतो. सबंध कादंबरी मनोरंजन पातळीवर सिद्ध होते. वाचकाला शेवटापर्यंत गुंतवून ठेवते, हे खरे तर लेखकाचे लेखन कौशल्य म्हटले पाहिजे. कादंबरीची सुरुवात व शेवट एखाद्या चित्रपटाचे कथानक असावे असे वाटते. हॅपी एंड आणि उत्सुकतावर्धक सुरुवात असा फार्मूला लेखकाने वापरला असल्याने त्याला साजेसे मुखपृष्ठ शिरीष घाटे यांनी चितारले आहे. कादंबरीतील संवाद हे तिच्या आशयाची घनता सिद्ध करते. लेखकाने खुसखुशीत संवाद रचना केल्याने ते वाचकाला भावतात. उदा. 'होय सरदार! बिनपगारी मास्तर देखील माणूस आहे नागरिक आहे. मतदार आहे, संविधानाने शिक्षकांना सुसंस्कारित पिढी घडविण्याचे कार्य सोपविलेले आहे....' पाठ राखण मध्ये सुभाष अहिरे यांनी हेच संवाद वाचकाला आकर्षित करतील म्हणून निवडलेले असावेत एकंदरीत मनोरंजनाच्या भावनेतून एकदाही कादंबरी वाचायलाच हवी.

**लेखक: सुरेश मोरे**
**प्रकाशक: गौरव साहित्य आलय सोलापूर**
**पृष्ठ: १९९**
**किंमत : ३६०/-**

## लेखकांना सूचना

- लेख, कथा, कविता, ललित लिखाण पाठवितांना शब्दमर्यादेचे भान पाळा., तसेच लेखातील सन, तारखा, आकडेवारी, वेळ हे इंग्रजीमधूनच पाठवावे.
- झेरॉक्स केलेल्या कुठल्याही साहित्याची दखल घेतली जाणार नाही.
- पुस्तक-परिचय पाठवितांना मूळ पुस्तक जरुर पाठवावे.
- शक्यतोवर संगणकावर टाईप केलेले साहित्य पाठवावे, अर्थात आपले हस्ताक्षर उत्तम असेल तर स्वहस्ताक्षरातील साहित्य चालेल.
- आपण पाठविलेले साहित्य २ महिन्याच्या आत प्रसिध्द न झाल्यास ते अस्विकृत समजावे, त्यासाठी वेगळा पत्रव्यवहार करु नये.
- 'बहर' साहित्य पुरवणी आहे. (रविवार)
- लक्षात ठेवा, आपला महाराष्ट्र आपले हक्काचे व्यासपीठ आहे. खानदेशातील उदयोन्मुख लेखक, कवी यांना अग्रक्रमाने स्थान दिले जाते.
- चला, तर मग उचला लेखणी. कृपया पाकिटावर 'बहर' साहित्य पुरवणीसाठी साहित्य याचा स्पष्ट उल्लेख करावा.
- 'बहर' साहित्य पुरवणी गुणवत्तेलाच संधी देते.

## खान्देश वैभव

प्राचार्य डॉ.अनिल बैसाणे
मो.९८२३२७७६१२
प्राचार्य डॉ.सुभाष पाटील
मो.९४२२२१८९९९



▶ धुळयाचे शाहीर सिद्राम बसाप्पा यांची सर्वत्र लोकप्रियता वाढली होती. त्यांच्या शाहीरीने लोकांना वेडच लागले होते. स्वातंत्र्य चळवळीला पुरक वातावरण निर्माण करण्याबरोबरच सामाजिक उत्थापनाकरिताही त्यांची शाहीरी प्रसिध्द होती. मद्यपानाचा निषेध, स्वाक्षरता प्रचार अश्या विषयांवर कवने रचून ती सादर करीत. तसेच स्वातंत्र्य आंदोलनातील काही प्रसंगांवरही कवने सादर करीत. लळींग जंगल सत्याग्रह प्रसंगी खानदेश गांधी बाळुभाई मेहता यांना अटक करण्यात आल्याच्या प्रसंगावर त्यांनी सादर केलेले गीत लोकप्रिय बनले होते.

# खानदेश भूषण राष्ट्रशाहीर स्वा.सैनिक सिद्राम बसाप्पा मुचाटे

देशाच्या स्वातंत्र्याकरिता नेते, कार्यकर्ते, सुधारक, क्रांतीकारक यांच्या बरोबरच शाहीर, कलावंत यांचेही योगदान महत्वपूर्ण राहिले आहे. आपल्या शहरातील शाहीर सिद्राम बसाप्पा मुचाटे हे प्रसिध्दीस आलेले एक नाव. त्यांनी देशभक्तीपर कवने आणि पोवाडयांची रचना करून समाज जागृतीचे कार्य केले. गावो-गाव फिरून ते स्वरचित कवने, डफ व खंजिरीच्या तालावर सादर करीत. देशाच्या स्वातंत्र्य लढयाकरिता समाजात जागृती निर्माण करणे हा एकच ध्यास त्यांच्या शाहीरीमागे होता. प्रदीर्घ वाटचालीत त्यांनी आपली राष्ट्रीय शाहीरी कला अमर केली. त्यांच्या कार्याने प्रभावित होवून अनेकांनी त्यांचे शिष्यत्व पत्करून कलेची उपासना करीत आयुष्य घालविले. शाहीरी कलेतून देशसेवेचे व्रत जोपासण्याची उदाहरणे दुर्मिळच ! मात्र त्यातून सिद्राम बसाप्पा मुचाटे यांना स्वा.सैनिकांबरोबर खानदेश भूषण राष्ट्रशाहीर हा सन्मानही प्रदान करण्यात आला होता.

**शाहीरीतच खरे धाडस :-** शाहीर सिद्राम बसाप्पा मुचाटे यांना अवघे ३७ वर्षाचे आयुष्य लाभले असले तरी हा अल्पायुषी काळ त्यांनी देशसेवेकरिता खर्च केला. शाहीरी ही काही भुमिगत अवस्था नसून ती जाहीरपणे प्रकट होण्याची प्रक्रिया असते. शाहीर सिद्राम बसाप्पा मुचाटे हे अत्याचारी ब्रिटीश शासनाविरोधात स्वत: कवणे आणि पोवाडे रचत. हे स्वरचित पोवाडे, कवने ते खंजिरी आणि डफाच्या तालावर सादर करीत. यातून ते शासनाविरूध्द समाज जागृती करून देशाच्या स्वातंत्र्य आंदोलनात योगदान देत. यामुळे त्यांना अनेक वेळा बंदी बनविण्यात आले होते. झालेल्या कारावासाची तमा न बाळगता त्यांनी तत्कालीन ऐतिहासिक घटनांवर आधारित शाहीरी डफावर थाप देत सुरूच ठेवली. आपल्या योगदानातून शाहीरीत खरे धाडस असते याचा प्रत्ययही आणून दिला.

**शाहीर मुचाटे यांची कवने :-**

धुळयाचे शाहीर सिद्राम बसाप्पा यांची सर्वत्र लोकप्रियता वाढली होती. त्यांच्या शाहीरीने लोकांना वेडच लागले होते. स्वातंत्र्य चळवळीला पुरक वातावरण निर्माण करण्याबरोबरच सामाजिक उत्थापनाकरिताही त्यांची शाहीरी प्रसिध्द होती. मद्यपानाचा निषेध, स्वाक्षरता प्रचार अश्या विषयांवर कवने रचून ती सादर करीत. तसेच स्वातंत्र्य आंदोलनातील काही प्रसंगांवरही कवने सादर करीत. लळींग जंगल सत्याग्रह प्रसंगी खानदेश गांधी बाळुभाई मेहता यांना अटक करण्यात आल्याच्या प्रसंगावर त्यांनी सादर केलेले गीत लोकप्रिय बनले होते. चल मर्दा - चल मर्दा पकडून नेई । खानदेशचे गांधी बाळुभाई ।। त्यांच्या अश्या गीतांना सामुहिकपणे दाद दिली जात होती. भारत हमारा देश है, हित उसका निश्चय चाहेंगे । उसके हित कारण हम, कुछ न कुछ कर जाएँगे ।। अशी हिंदीतील गीतेही लोकप्रिय ठरली होती. त्यांनी स्वरचित गीतांबरोबरच भारतीयांच्या मनावर अधिराज्य गाजविणा-या सारे जहाँ से अच्छा हिंदोस्ता हमारा । सारखी भावना उचंबळून टाकणारी गीतेही गायली ।

**शाहीर मुचाटे यांच्या शाहीरीचे स्वरूप -**

तरूण तडफदार आणि उमद्या शाहीर मुचाटे यांनी समाजसुधारणा आणि देशकार्यासाठी जनमत जागृतीचे नि:स्वार्थपणे व्रत स्विकारले होते. हया कार्याविषयीच्या भावना ते आपल्या पोवाडयांमधून छातीठोकपणे व्यक्त करीत.खरे तर अश्याच शाहीरांची कालपरत्वेही गरज असतेच. स्वरचित कवने आणि पोवाडे तसेच इतर कवींचे राष्ट्रीय गीते सादर करण्याबरोबरच ते उत्कृष्ट पध्दतीने डफ वाजवित असत. या विषयीचा सखोल अभ्यास आणि प्रगल्भता त्यांच्यात होती. कलावंताचा निसर्गदत्त ठेवा त्यांनी आयुष्याच्या शेवटपर्यंत जोपासला होता. देशहिताची जाण, अन्यायाबद्दलची चिड आणि समाजात चैतन्य निर्माण करणे असे सिद्राम बसाप्पाच्या शाहीरीचे स्वरूप होते. श्रोत्यांच्या काळजाचा ठाव घेणा-या त्यांच्या पोवाडयांमुळे स्वातंत्र्याची उर्मी ओसंडून वाहत असे. यातच त्यांना मोठा आनंद मिळत होता

**देशभक्तीपर शाहीरी वाटचाल :-**

देशाच्या स्वातंत्र्याच्या वाटचालीच्या या काळात सर्वत्र मोठया प्रमाणात प्रभातफे-या काढल्या जात. त्यात स्वयंसेवकांसह स्त्री-पुरूष सामील होत. त्या प्रसंगी देशभक्तीपर गीते, पोवाडे सामुहिकपणे म्हटली जात. याव्यतिरिक्त स्वतंत्रपणे गाणे, पोवाडयांचे कार्यक्रमही सादर केले जात. यात जळगाव येथील शाहीर वि.ग.कुलकर्णी, मालेगांव येथील शाहीर नाना गोखले हे खणखणीत आवाजात पोवाडे गात. या सर्व शाहीरांच्या अग्रणी मात्र धुळे येथील सिद्राम बसाप्पा शाहीर हेच होते. त्यांच्या पोवाडयांचे कार्यक्रम सर्वत्र आयोजित केले जात. श्री. अनंत श्रीधर क्षिरे हे सुध्दा स्वातंत्र्याने भारावलेल्या विचारांचे शाहीर होते. ब्रिटीश सत्तेला प्रखर विरोध करणारी कवने ते करीत. समर्थ मेळा चालविणाऱ्या या शाहीराचे मोडा परसत्तेचे बंड रे । सावध व्हा रे अखंड, इंग्रज नोकर, हमाल । काळे ह्या राज्याला चालविती ।। अनंत क्षिरे यांनी रचलेले हे गीत ब्रिटीश शासनाला आक्षेपार्ह वाटले होते. म्हणून त्यांना २ वर्षाची सक्तमजुरीची शिक्षा सुनावण्यात आली होती. ज्या स्वयंसेवकाने हे गीत जाहीर सभेत सादर केले



त्यालाही शिक्षा करण्यात आली होती. त्यांच्यावर लो. टिळकांच्या कार्याचा आणि विचारांचा प्रभाव होता.

हा काळ राष्ट्रप्रेमाने भारावलेल्या तरूणांचा होता. भजन-कीर्तने, पोवाडे, कवने यांच्यातून ठिकठिकाणाहून राष्ट्रीय जागृतीची कार्ये केली जात. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमावर आधारित पोवाडे, नाटके सादर करून ब्रिटीश शासनाविरूध्द तरूणांमध्ये आत्मविश्वास जागृत केला जाई. तसेच रखे सुख मे सदा भगवान । हमारा प्यारा हिंदुस्तान ।।, मातृभूमी तेरे चरणो मे शिश नमाऊँ । अश्या काव्यांबरोबरच देशाचा संसार आहे शिरावरी । ऐसे थोडे तरी वाटू द्या हो । अश्या काव्यपंक्तींद्वारे सेनापती बापटांनी काव्यांवर कळस चढविला होता. या सर्व बाबींचा अभ्यास केला तर धुळयातून उभ्या राहीलेल्या सांस्कृतिक वाटचालीतून साध्य होणारे राष्ट्रीय कार्य ही खानदेश करीता गौरवास्पद बाब आहे.

**शाहीर मुचाटे यांची शिष्यपरंपरा :-**

राष्ट्रहित, त्याग, आदर्श अश्या गुणी व्यक्तीमत्वासमोर सर्वच जण नतमस्तक होत असतात. सद्गुणी अश्या शाहीर मुचाटेंची महाराष्ट्रात मोठी शिष्यपरंपरा निर्माण झाली होती. त्यांना अनेक शाहीरांनी वंदन करून शिष्यत्व पत्करले होते. महाराष्ट्रभरातून लाभलेल्या या शिष्यपरंपरेमुळे तर धुळे शहराला शाहीर मुचाटेंच्या रूपाने मोठा सन्मानच लाभलेला होता. पुणे येथील शाहीर किसनराव हिंगे (महाराष्ट्र शाहीर परिषदेचे अध्यक्ष), शाहीर कृष्णराव साबळे (मुंबई), शाहीर आत्माराम पाटील (मुंबई), कोल्हापूर येथील शाहीर श्रीपतराव लोखंडे, शाहीर बाबुराव धुळेकर, शाहीर बाबुराव घोटकर (चाळीसगांव) असे महाराष्ट्रातून शिष्य सिद्राम मुचाटे यांना लाभलेले होते. कोल्हापूर, पुणे आणि मुंबई यासारख्या सांस्कृतिक केंद्रे असलेल्या नगरातील शाहीरांचे गुरू हे खानदेश भुषण ठरलेले सिद्राम मुचाटे होते ही आपल्याकरिता अभिमानास्पद बाब ठरते. धुळे शहरातूनही त्यांचा शाहीरीचा संपन्न वारसा शाहीर पांडूरंग हेकरे व शाहीर लक्ष्मण साठे यांनी तितक्यात ताकदीने चालविला होता.

**शाहीरी वाटचालीतील कौटुंबिक साथ :-**

कोणत्याही क्षेत्रातील यशस्वी पुरूषाला त्याच्या कुटुंबियांकडून मिळालेली साथ-संगत फारच महत्वाची बाब ठरत असते. शाहीर सिद्राम मुचाटेंना त्यांच्या धर्मपत्नी यमुनाबाई यांनी तर साथ दिलीच मात्र बंधू श्री.दत्तात्राय आणि वहिनी श्रीमती भागीरथीबाई यांचेही मौलिक सहकार्य लाभले होते. धर्मपत्नी यमुनाबाईंनी साथ दिली नसती तर सिद्राम मुचाटे शाहीर म्हणून घडलेच नसते. घडले नसते असेच जाणकार म्हणत होते. या मातेने सिद्राम मुचाटे यांना दिलेल्या सहकार्यावर श्री. नागेश मोगलाईकर हे या परिस्थितीच्या अनुषंगाने एका काव्यात व्यक्त होतांना म्हणतात की, यश अवलंबून ते पुरूषाचे, स्त्री पुण्यावरती । जसा ध्वज नभी मुक्त लहरतो ध्वजस्तंभावरती ।। उंच डौलाने फडकणारा ध्वज जरी सर्वांच्या दृष्टीस पडत असला तरी त्याचा सर्वस्वी आधार हा स्तंभच असतो हा सदर काव्यातील मर्मच जणु काय सिद्राम मुचाटेंच्या शाहीरी प्रसिध्दीत दडला होता. यमुनाबाईंच्या साथ-संगतीमुळेच सिद्राम मुचाटेंनी स्विकारलेले देशसेवेचे ध्येय साकार झाले.

**प्रथम देशभक्ती नंतर कुटुंब :-**

देशभक्तीने झपाटलेले शाहीर सिद्राम मुचाटे यांची महाराष्ट्राबरोबरच बाहेरही दौरे होत असत. अश्याच एका कर्नाटक दौ-याप्रसंगी त्यांची थोरली लेक सुशिला आजारी पडली होती. तिचा आजार बळावल्याने अंत्यवस्थ स्वरूप धारण केले होते. शाहीर सिद्राम मुचाटे यांनी कनार्टक दौरा आटोपता घेवून धुळयास आपल्या घरी परत यावे अशी कौटुंबिक आस असणे स्वाभाविक होते. त्याकरिता त्यांना पत्रे, निरोप पाठविण्यात आले. मात्र शाहीर मुचाटे हे नियोजित दौरा पूर्ण करूनच घरी परतले. मात्र त्यांच्या लाडक्या लेकीचा मृत्यु होवून तीन दिवस उलटले होते. तिची साधी भेट तर जाऊ द्या मात्र अंत्यदर्शनही झाले नाही. यावर सौ.शैलजा नंदी (मोगलाईकर) ह्या भावनोत्कट उद्गार काढतांना म्हणतात की, स्वातंत्र्याची कळकळ व ज्वलंत देशभक्ती यापुढे शाहीरांना स्वत:च्या मुलीचे दु:ख व आजारपणही दिसले नाही. अशी राष्ट्रनिष्ठा बाळगणारे खानदेश भूषण राष्ट्रशाहीर सिद्राम मुचाटे हे निराळेच !

**अहो, मी यरोड्याला यमाचा दरबार पाहिला :-**

देशाच्या स्वातंत्र्याकरिता योगदान प्रसंगी बलीदान देणा-या देशभक्तांना कारागृहांमध्ये डांबून त्यांचा अतोनात छळ केला जाई. महाराष्ट्रात याकरिता पुणे येथील येरवडा कारागृह प्रसिध्द होते. येथे महात्मा गांधींसह अनेक राष्ट्रीय नेत्यांना बंदी बनविण्यात आले होते. आपल्या धुळे शहरातील शाहीर मुचाटे यांना स्वातंत्र्य आंदोलनातील योगदानामुळे तीन वेळा कारावास घडला होता. लोककलेचा माध्यमातून राष्ट्रीय कार्याला समर्पित झालेल्या या शाहीराने सांसारिक सुखाचा त्याग केला. सतत दौरे काढून शाहीरीतून समाज जागृतीचे कार्य केले. भारतमातेच्या मुक्तीकरिता आपल्या संसाररूपी वेलीवर उमजलेल्या फुलाचीही कुर्बानी दिली असे म्हटले तरी ते वावगे ठरणार नाही. एव्हढा त्याग या शाहीराने केला होता. सहा-सहा महिन्याचे तीन वेळा झालेले तुरूंगवास, तुरूंगामध्ये झालेले अतोनात हाल व छळ यावरही त्यांनी पोवाडे रचले होते अहो, मी येरोडयाला यमाचा दरबार पाहिला । असे आपल्या पोवाडयातून वर्णन करून देशभक्तीच्या कसोटया किती भीषण असतात याचा प्रत्ययच आणून दिला. अशा थोर देशभक्त शाहीर सिद्राम बसाप्पा मुचाटे यांना विनम्र अभिवादन !

## सुजाण पालक

डॉ.अभिनय दरवडे
मो.७५८८१०४००७




# लहान मुलांमधील आक्रमकता कारणे आणि उपाय

आजकाल लहान मुलांमध्ये वाढती आक्रमकता दिसून येते. थोडंसं काही उलट झालं की मुलं रडतात, रुसतात, वस्तू फेकतात किंवा जोरात ओरडतात. पालक आणि शिक्षकांसाठी ही चिंता वाढवणारी गोष्ट आहे. पण हा बदल का होत आहे? आणि त्यावर काय उपाय करता येतील? चला, याचा सखोल विचार करूया.

आक्रमकतेची कारणे

१. स्क्रीन टाइम वाढणे मोबाईल, टॅब्लेट, टीव्ही यांचा अतिवापर मुलांच्या भावनिक संतुलनावर परिणाम करतो. हिंसक कार्टून, गेम्स आणि इंटरनेटवरील आक्रमक दृश्ये मुलांमध्ये आक्रमक वर्तन निर्माण करू शकतात.





२. शारीरिक हालचालींची कमतरता पूर्वीची मुलं मैदानी खेळ खेळत असत, धावत-फिरत असत, त्यामुळे त्यांची ऊर्जा सकारात्मक पद्धतीने वापरली जात होती. आजच्या काळात ही संधी कमी झाल्याने ऊर्जा आक्रमक वागण्यात रूपांतरित होते.

३. संवादाचा अभाव पालक व्यस्त असल्यामुळे किंवा तणावाखाली असल्यामुळे मुलांशी संवाद कमी होतो. मुलांच्या भावनांना योग्य व्यक्त करण्याची संधी न मिळाल्यास ते चिडचिड करू लागतात.

४. संवेदनशीलता आणि स्पर्धा शाळा आणि समाजातील वाढती स्पर्धा मुलांवर तणाव टाकते. शिक्षणात उत्तम कामगिरी करावी, सतत नंबर वन राहावे, या दडपणामुळे मुलं अस्थिर होऊ शकतात.

५. आहार आणि झोपेच्या सवयी जंक फूडचा वाढता वापर आणि अपुरी झोप यामुळे मुलांच्या मेंदूच्या कार्यक्षमतेवर परिणाम होतो आणि त्यांना चिडचिड, अस्वस्थता येते.

आक्रमकतेवर उपाय

१. स्क्रीन टाइम मर्यादित करा मुलांसाठी स्क्रीन टाइमवर नियंत्रण ठेवा. त्यांना जास्तीत जास्त मैदानी खेळ खेळण्यास प्रवृत्त करा.

२. भावनांची योग्य हाताळणी शिकवा मुलांना त्यांच्या भावनांची जाणीव करून द्या. तुला राग येतोय का?, तू नाराज आहेस का? असे प्रश्न विचारून त्यांना संवादासाठी प्रोत्साहित करा.

३. गुणवत्तापूर्ण वेळ द्या पालकांनी मुलांसोबत वेळ घालवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. दररोज काही वेळ त्यांच्यासोबत गप्पा मारा, त्यांचे अनुभव ऐका. पालकांनी मुलांसाठी वेळ काढणं हे सर्वात महत्वाचं आहे!

४. योग्य आहार आणि झोप सुनिश्चित करा मुलांना संतुलित आहार द्या. शक्यतो जंक फूड टाळा आणि त्यांना पुरेशी झोप मिळेल याकडे लक्ष द्या. त्यासाठी घरातल्या सर्वांनीच लवकर निजे लवकर उठे.. हे तत्व पाळायला हवं!

५. शिस्तीचे योग्य तत्त्व अंगीकारा मुलांना प्रेमाने पण ठामपणे शिस्त लावा. चुकीच्या वागणुकीवर योग्य रीतीने समज द्या आणि चांगल्या वागणुकीचे कौतुक करा. मुलांना मारू नका!


निष्कर्ष

लहान मुलांची आक्रमकता ही काळजी करण्यासारखी बाब आहे, पण त्यावर योग्य पद्धतीने उपाय केले तर ते अधिक आनंदी आणि समजूतदार बनू शकतात. पालकांनी संयमाने आणि प्रेमाने मुलांचे संगोपन केल्यास त्यांच्यातील आक्रमकता नक्कीच कमी होईल.



## राशी भविष्य

सुमेध रानडे, पुणे
मो.९५६१०९३७४०









२ मार्च ते ८ मार्च




▶ हा आठवडा एकूण सगळ्याच राशींना सावध आणि सतर्क राहण्याचा सल्ला देणारा! मेष कन्या वृश्चिक मीन या राशींना लाल सिग्नल, वृषभ मिथुन कर्क सिंह तूळ धनू मकर कुंभ या राशींना पिवळा सिग्नल.

**मेष:** हा आठवडा तुमच्यासाठी वक्री शुक्र व्ययातून जात असल्यामुळे चिंतेचा आणि वैवाहिक अडचणींचा असण्याची शक्यता आहे. आठवड्याची सुरुवात एखाद्या कटकटीने किंवा भांडणाने होऊ शकते. एखाद्या किरकोळ दुखण्याचा त्रास होऊ शकतो. त्यातल्या त्यात आठवड्याचा मध्य कौटुंबिक आनंद देऊन जाईल. प्रिय व्यक्ती भेटतील आणि आर्थिक लाभ होईल. हवा तो प्रवास घडेल. शेवटी होणारी रवी शनी युती संतती संबंधी काळजी उत्पन्न करू शकते.

**वृषभ:** आठवड्याच्या सुरुवातीला राशीस्वामी वक्री होत असल्यामुळे एखादा शारीरिक त्रास होऊ शकतो पण लाभात होणारी चंद्र शुक्र युती त्यातून मार्ग काढून देईल. मित्र मैत्रिणी किंवा नातेवाईक ओळखीच्यांकडून फसवणूक किंवा नुकसान संभवते. आठवड्याचा मध्य लेखन वाचन आणि इतर छंद कला साठी चांगला जाईल. नोकरीत जास्त जबाबदाऱ्या अंगावर पडण्याची शक्यता आहे. आठवड्याच्या शेवटी मातृचिंता निर्माण होऊ शकते.

**मिथुन:** हा आठवड्या शुक्राचे वक्री भ्रमण दशमातून होत असल्यामुळे एकूण कर्तृत्वात कष्टाला हवे तसे यश मिळणार नाही. आठवड्याची सुरुवात नोकरी व्यवसायात एखादा संभ्रम निर्माण करणारी राहील. भरपूर काम करावं लागेल पण समाधान मिळणार नाही. वरिष्ठांची मतभेद होऊ शकतात. आठवड्याच्या मध्यात जोडीदाराबरोबर कुठेतरी फिरायला जाणे होऊन आनंद मिळण्याची शक्यता आहे. आठवड्याच्या शेवटी या सगळ्या परिस्थितीत सुधारण होण्याची शकता!

**कर्क:** या आठवड्यात देखील व्ययातून होणारे मंगळाचे वक्री भ्रमण तुमची पाठ सोडणार नाही! काही न काहीतरी किरकोळ त्रास होतील! चिडचिड होईल. आठवड्याच्या सुरुवातीला चंद्राचे भाग्यातून होणारे भ्रमण आणि वक्री शुक्र यांच्यामुळे एखादी अनपेक्षित चांगली घटना घडू शकते. आठवड्याच्या मध्यात नातेवाईक किंवा परिचित लोकांना भेटून किंवा त्यांच्या मुळे परिस्थिती सुधारेल. आठवड्याचा शेवट मात्र त्रासदायक जाण्याची शक्यता. तब्येत आणि आर्थिक बाबतीत सतर्क रहा.

**सिंह:** या आठवड्यात अष्टमात ग्रहस्थिती बरी नसल्यामुळे फार प्रगतीची अपेक्षा ठेवू नका. अडचणी येतील आणि पटकन त्यातून मार्ग निघणार नाही हे मान्य करा. आठवड्याची सुरुवात एखाद्या कौटुंबिक समस्येने होऊ शकते. नोकरी व्यवसायात राजकारण अनुभवायला मिळू शकते आणि त्याचा त्रास होऊन तब्येतीवर परिणाम होण्याची शक्यता आहे त्यामुळे काळजी घ्या. आठवड्याच्या मध्यात संतती कडून सुख प्राप्ती होईल. आठवड्याचा शेवट वैवाहिक कटकटीचा.

**कन्या:** या आठवड्यात राशीस्वामी नीच राशीतून भ्रमण करत असल्यामुळे तुमच्या एकूण प्रयत्नांना तितके यश येणार नाही. सगळं काही नीट असूनही मनाची सतत घालमेल होऊ शकते. मानसिक चंचलता राहील. आठवड्याची सुरुवात वैवाहिक कटकटी निर्माण करणारी असली तरी आठवड्याचा मध्य येताच काही प्रश्न सुटतील. नोकरीत अत्यंत प्रतिकूल परिस्थितीचा सामना करावा लागू शकतो. आठवड्याचा शेवट संतती संबंधी चिंता देणारा.

**तूळ:** या आठवड्यात षष्ठातील ग्रहांची स्थिती तुम्हाला एक न अनेक अडचणी आणणारी ठरेल. त्यात राष्याधीपती वक्री असल्यामुळे अनपेक्षित घटना घडतील. आठवड्याची सुरुवात तब्येतीच्या तक्रारींनी होऊ शकते, विशेष करुन कफाचे त्रास. आठवड्याच्या मध्यात एखादा अनपेक्षित लाभ होण्याची शक्यता आहे. कामाच्या ठिकाणी मात्र जपा. फसव्या लोकांना भुलू नका. आठवड्याच्या शेवटी तुमच्या कलेतून किंवा छंदातून तुम्हाला चांगला लाभ होण्याची शक्यता.

**वृश्चिक:** या आठवड्यात देखील राशीस्वामी मंगळ वक्री असून अष्टमात असल्यामुळे तापदायक ठरणार आहे. आठवड्याची सुरुवात कला क्रीडा छंद यात प्रगती देऊन जाईल. पण प्रेमात मात्र फसगत आणि अपयश येण्याची शक्यता त्यामुळे मनाची तयारी करुन ठेवा. आठवड्याचा मध्य व्यवसायातील भागीदारीसाठी उत्तम जाईल. वैवाहिक समस्या सुटतील. आठवड्याचा शेवट मातृपितृचिंतेचा आणि नोकरीत वरिष्ठांशी मतभेदाचे प्रसंग आणणारा असू शकतो.

**धनू:** या आठवड्यात चंद्राचे भ्रमण आणि वक्री शुक्र यांच्यामुळे तुमच्या घरात खळबळजनक घटना घडतील. घर वाहन जमीन या संबंधात महत्त्वाचे निर्णय टाळा. आठवड्याची सुरुवात मातृचिंता निर्माण करणारी असू शकते. अचानक एखादी जबाबदारी पडू शकते. आठवड्याचा मध्य वडीलधारी मंडळींच्या सहवासाचा आणि त्यातून काही प्रमाणात दिलासा मिळण्याचा राहील. आठवड्याचा शेवट एखादा मनाविरुद्ध प्रवास दाखवतो आहे. खाण्यापिण्यात कुपथ्य नको!

मकर: या आठवड्याची सुरुवात तृतीयातील प्रतिकूल ग्रह स्थितीमुळे भावंडांची काळजी उत्पन्न करणारी आहे. विशेष करून बहिणीची जबाबदारी येण्याची शक्यता आहे. प्रेम प्रकरणात लिहिण्या वाचण्यातून अडचणी येऊ शकतात. आठवड्याचा मध्य वैवाहिक आनंदाचा जाईल. संतती संबंधी आनंदाची बातमी मिळू शकते. आठवड्याचा शेवट मात्र आरोग्याच्या तक्रारींचा असू शकतो. घसा कान नाक कफ असे त्रास होऊ शकतात. पाठ मान खांदा हात यांना जपा.

**कुंभ:** या आठवड्यात देखील राशीस्वामी राशीत आणि भाग्येश धनात असल्यामुळे आर्थिक आघाडीवर चांगली फळं मिळतील. मात्र शुक्र आता वक्री होत असल्यामुळे प्रलोभन आणि फसव्या मोहापासून सावध रहा. झटपट पैसे जसे मिळतात तसे जाऊ ही शकतात ही लक्षात ठेवा. कुटुंब स्वास्थ्य डगमगण्याची शक्यता आहे त्यामुळे शांत राहणे उत्तम होईल. आठवड्याच्या शेवटी वैवाहिक आयुष्यात काही त्रास होण्याची शक्यता. आहे त्यात समाधान मानून पुढे जाणे उत्तम.

**मीन:** आठवड्याची सुरुवात राशीतून होणाऱ्या वक्री शुक्राच्या भ्रमणाने आरोग्याच्या तक्रारी उत्पन्न करणारी ठरू शकते. कफाचे त्रास होऊ शकतात. पाण्याच्या सावधता बाळगा. घरगुती चिंता लागून राहू शकते. घर जमीन वाहन या संबंधी महत्वाचे निर्णय टाळा. आठवड्याचा मध्य दिलासादायक राहील. लहान प्रवासातून आनंद मिळेल. भावंडांची साथ चांगली मिळेल. लेखन, वाचन, शिक्षण किंवा कलेत प्रगती होईल. आठवड्याचा शेवट पितृचिंता निर्माण करणारा.

## शौर्योद्गारांचा इतिहास

संजय धनगर
मो.९६३७३२५१६०

# गड आला, पण सिंह गेला..!

'गड आला पण सिंह गेला..!' हे उद्गार हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांनी कोंडाणा किल्ला औरंगजेबाच्या ताब्यातून पुन्हा स्वराज्यात जिंकून घेतानाच्या युद्धात धारातीर्थी पडलेल्या



पराक्रमी व लढवय्या तानाजी मालुसरे यांच्या बलिदानानंतर अत्यंत दुःखद अंतःकरणाने काढले.

शाहिस्तेखानाचा पराभव, मुघलांच्या ताब्यातील व्यापारी पेठ सुरत दोन वेळा लुटणे यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात वरचढ ठरू पाहणाऱ्या शिवाजी महाराजांचा बंदोबस्त करण्यासाठी औरंगजेबाने महान सेनानी मिर्झाराजे जयसिंग यास ८० हजार सैन्य व सोबत दिलेरखानास देऊन महाराष्ट्रात पाठवले. त्याने स्वराज्यातील पुरंदर या किल्ल्यास वेढा दिला. त्यावेळी गडावर महाराजांचा शूर, लढवय्या योद्धा मुरारबाजी देशपांडे होता. दिलेरखान व मुरारबाजी यांचेत घनघोर युद्ध झाले. मुरारबाजी प्राणपणाने लढला. इतिहासात असे वर्णन आहे की धडापासून मस्तक शत्रूच्या बाणाने छेदल्यानंतरही मुरारबाजींचे धड कितीतरी वेळ तलवार चालवत होते. मुरारबाजींचा पराक्रम व शौर्यानंतरही पुरंदर किल्ला पडला व काळाची पुढील पाऊले ओळखून राजांनी जयसिंगाशी ११ जून १६६५ या दिवशी तह केला. हाच तो इतिहासप्रसिद्ध पुरंदरचा तह. या तहानुसार राजांना स्वराज्यातील २३ किल्ले, स्वराज्यातील चार लाख होन उत्पन्नाचा प्रदेश, चाळीस लाख खंडणी राजांवर लादली. तसेच शिवाजी महाराजांनी औरंगजेबाच्या भेटीसाठी आग्र्याला यावे असे ठरले. हेतू हा की राजांना काही काळ महाराष्ट्राच्या राजकारणापासून दूर ठेवणे.

पुरंदरच्या तहानुसार तसेच उत्तरेकडील प्रदेशाचा प्रादेशिक व भौगोलिक अभ्यास करणेच्या हेतूने शिवाजी महाराज बादशहाच्या भेटीला बाळराजे संभाजी व आपल्या निवडक विश्वासू मावळ्यांसह गेले, पण बादशहाने फसवून त्यांना नजरकैद केले.

शिवाजी महाराजांनी मोठ्या हिंमतीने व युक्तीने बादशहाच्या नजरकैदेतून बाळराजे संभाजी व सर्व मावळे आणि स्वतःची सुटका करून घेतली. साधू, संत, फकीर, भिकारी अशी विविध रूपे घेत राजे स्वराज्यात सुरक्षित पोहचले. ही घटना शिवाजी महाराजांच्या जीवनातील अनेक धाडसी व रोमहर्षक घटनांपैकी एक !

शिवराय स्वराज्यात आले आणि काही दिवसांच्या विश्रांतीनंतर मधल्या काळात स्वराज्याची विस्कटलेली घडी नीट बसवण्याच्या तयारीला लागले. पुरंदरच्या तहात मुघलांच्या ताब्यात गेलेल्या किल्ल्यासंबंधीची सल त्यांच्या मनात होती. त्यापैकी कोंढाणा किल्ला हा स्वराज्यातील पुणे शहराजवळील एक ऐतिहासिक व महत्वाचा किल्ला. 'कौडिण्य' ऋषीच्या नावावरून या किल्ल्याला मूळ 'कोंडाणा' असे नाव पडले. मातोश्री जिजाऊच्या सूचनेवरून हा किल्ला मुघलांच्या ताब्यातून घेण्यासाठी शिवाजी महाराजांनी तयारी सुरू केली. सर्व मावळ्यांना, सरदारांना त्याची कल्पना दिली गेली. त्यापैकीच एक म्हणजे कोकणातील उमरठचे शिवाजींच्या सैन्यातील शूर सुभेदार तानाजी मालुसरे. याचदरम्यान त्यांनी आपल्या मुलाचे - रायबाचे लग्न काढले होते. महाराजांना मुलाच्या लग्नाचे निमंत्रण देण्यासाठी तानाजी गेले असता, महाराज म्हणाले तानाजी, आम्ही रायबाच्या लग्नाला येऊ शकणार नाही; कारण याच दरम्यान कोंढाणा किल्ला सर करण्याची मोहीम आम्ही हाती घेतली आहे. तेव्हा तानाजी म्हणाला, महाराज आम्ही असताना तुम्ही युद्धावर जाणे. हे शक्य नाही. आधी लगीन कोंढाण्याचे मग रायबाचे ! महाराज तुम्ही निश्चिंत रहा. आम्ही सर करतो कोंढाणा.''

मोठ्या जड अंत:करणाने महाराजांनी तानाजीला कोंढाणा किल्ल्याच्या मोहिमेवर जाण्याची परवानगी दिली. कोंढाणा किल्ला अभेद्य. त्याची तमा न करता तानाजी आपला भाऊ सूर्याजी व शेलारमामा यांचेसह मोहीम आखली. तानाजीने निवडक सैन्यासह किल्ल्याच्या मागील बाजूने तर सूर्याजीने मुख्य दरवाजातून प्रवेश करून हल्ला करायचा असा व्यूह निश्चित केला. माघ वद्य नवमीच्या किर्रर अंधा-या रात्री ४ फेब्रु. १६७० या दिवशी तानाजीने यशवंती या घोरपडीच्या सहाय्याने किल्ल्याच्या मागील सर्वात कठीण बाजूने दोर बांधून मावळ्यांनी किल्ल्यात प्रवेश मिळवला. ही कड्याची चढण्यास सर्वात कठीण बाजू असल्याने ह्या जागेवर शत्रूचे फारसे सैनिक तैनात नव्हते. तानाजी व मावळे ९० अंशाचा कडा वर चढून गेले. वर पोहोचल्यावर तानाजींचे मावळे व मुघल सेनेत जोरदार लढाई चालू झाली. तानाजी मालुसरे आणि उदयभान राठोड यांच्यात लढाई झाली. लढता लढता उदयभानने तानाजीची ढाल फोडली. तानाजीने पगडीचे कपड हाताला गुंडाळून लढाई सुरूच ठेवली. काही वेळानंतर मराठ्यांची सरशी होत होती, मात्र तेवढ्यात जखमी तानाजी उदयभानकडून ठार झाले. सेनानी तानाजी पडल्याने मावळ्यांचा धीर सुटला व पळू लागले, हे पाहून मुख्य दरवाजाकडून किल्ल्यात पोहचलेले सूर्याजी मालुसरे यांनी हिंमत धरून युद्धाची सूत्रे ताब्यात घेतली. सूर्याजींनी परतीचे मार्ग बंद केले व मावळ्यांना लढा किवा मरा ! असा आदेश दिला. शेलारमामा ह्यांनी ज्या दोरखंडाच्या साहाय्याने मावळे गड चढले तो दोरखंड कापला . जखमी उदयभानही फार काळ वाचू शकला नाही. शेलार मामांनी उदयभानच्या छातीत आपली तलवार घुसवली व त्याला ठार केले. सूर्याजीच्या उद्गारांनी प्रेरित झालेल्या मावळ्यांनी पुन्हा स्फुर्तीनी लढून किल्ला सर केला. सूर्याजी मालुसरे ह्यांनी मुघल सैन्याला पराभूत केले. मराठा सैन्याने किल्ला ताब्यात घेतला. छत्रपती शिवाजी महाराजांना गड जिंकल्याची पण तानाजी गेल्याची बातमी मिळाली तेव्हा ते म्हणाले, कोंढाणा किल्ला सर झाला, पण माझा सिंहासारखा तानाजी गेला. ''गड आला, पण सिंह गेला. शूर व. पराक्रमी तानाजीच्या स्मरणार्थ कोंढाणा किल्ल्याचे नाव ' सिंहगड ' असे ठेवले गेले.यथावकाश महाराजांनी स्वतःचे उपस्थितीत रायबाचे लग्न लावून दिले. स्वराज्याच्या उभारणीच्या कामी स्वत:च्या जीवावर उदार होऊन जीवात जीव असेपर्यंत महाराजांना साथ देणारे मावळे होते; म्हणून शिवाजी महाराज स्वराज्य स्थापनेचे स्वप्न पाहू शकले आणि ते सत्यात उतरवू शकले.

## हसा ना गडे

दत्ता जोशी
मो.८३२९९२२०२७

# लग्नाआधी बायको सोबत पिक्चर

फार जुन्या काळातली ही गोष्ट आहे. आम्हाला पिक्चरला जायचं आहे. मी सासुरवाडीला गेल्यावर घाबरत घाबरत परवानगी वजा सूचना विचारल्या सारखं विचारलं. घाबरत या साठी की त्या काळात लग्नाच्या आधी असं सिनेमाला वगैरे जाण खूप मोठी धाडसाची गोष्ट होती.

एक तर सिनेमा हा प्रकारच वेगळ्या लोकांच्या आवडीचा आणि करमणुकीचा प्रकार. त्यात त्याला त्या काळात सामाजिक दर्जा नव्हता. त्या मुळे एखाद्याला सिनेमाचा षोक असणं थिल्लर पणाच लक्षण मानलं जायचं.

त्यात मी मुंबईचा, बायको गावाकडची. तिचं गावं छोटं. सगळी कडे लगेच बोभाटा होणार. लग्नाच्या आधी सिनेमाला गेले म्हणून.

काय झालं कुणास ठाऊक. पण सासऱ्यांनी परवानगी दिली. मला तर खरंच वाटेना. विश्वासच वाटतं नव्हता. पण ते खरं होतं. संध्याकाळी सहाचा शो होता. त्यांच्या गावात फक्त एक सिनेमा थिएटर. तेही एकदम सुमार दर्जाचं. ॲडव्हान्स बुकिंग वगैरे प्रकार नाही.



जशी जागा पकडाल तशी मिळेल. अशा वेळी चांगली जागा मिळणे म्हणजे एक तर खुर्ची समोर खांब न येणं किंवा आपल्या समोर कुणी उंच माणूस न बसणं. पण जाऊ दया, या फार छोट्या गोष्टी होत्या. या आधी मी असलं धाडस कधीच केलेलं नव्हतं त्या मुळे मीच जास्त हुरळून गेलो होतो.

संध्याकाळी सहाचा शो होता म्हणून आम्ही पाच सव्वा पाचला जायचं ठरवलं. आम्ही घरातून निघणार तेव्हढयात हिचे सख्खे दोन लहान भाऊ आम्ही पण पिक्चर ला येणार म्हणून रुसून बसले. जावाई म्हणून मला मनाचा मोठेपणा दाखवण्यासाठी येवू द्या ना त्यांना म्हटल्यावर दोघेही जण मस्त खाकी हाफ पॅन्ट आणि त्यात खोचलेला पांढरा शर्ट अशा शाळेच्या वेषात तयार झाले. भांग बिंग पाडून पावडर लावून ते तयार झाले. आम्ही जायला निघणार तेव्हढयात पुढच्या गल्लीत राहणाऱ्या काकांची चार मुलं आणि एक मुलगी शाळेच्या वेषात तयार होऊन आले. ही सगळी पलटण पहिल्यावर माझ्या तर पोटातच गोळा उठला. तरी मी कसाबसा हसरा चेहरा ठेवला होता. मुलं पिक्चरला जायच्या निरागस आनंदात होती.

निघायचं का आता असं मी विचारल्या वर, दोन मिनिटं थांबा ना, ताईची दोन मुलं येतच असतील आता. हे ऐकल्या वर तर माझा धीरच सुटला. तिची तिन्ही चुणचुणीत मुलं एकदम तयार होऊन आमच्या सोबत यायला निघाले. हिचे सख्खे भाऊ दोन, काकांची पाच मुलं, बहिणीची तीन मुलं अशी एकूण दहा मुलांची पलटण आमच्या सोबत सिनेमाला निघाले.

रस्त्याने जातांना एकाला उसाचा रस दिसल्यावर तहान लागली. मग सगळ्यांनीच रस पिला. एक लहान मुलगा तर मला सोडतच नव्हता. गाणे म्हणून दाखव, पाढे म्हणून दाखव, मध्येच कविता म्हणून दाखव असं त्याच सुरु होतं. मला आणि बायकोला काही बोलायलाच भेटलं नाही.

एकूण मोजून बारा तिकीट काढली मी पिक्चरची. डोअर किपरने आत सोडताच सगळे पोरं आत जागा पकडायला धावले. एका टोकाला माझी बायको, मध्ये दहा मुलं आणि दुसऱ्या टोकाला मी अशी आमची सिनेमातली बैठक व्यवस्था होती. पिक्चर कोणता होता आठवत नाही. कारण माझ्या खुर्ची समोर एक लाकडी चौकोनी खांब आलेला होता. त्याला हताश पणे डोकं टेकवून मी पिक्चर संपेपर्यंत बसून राहायलो.

मला अजूनही एक गोष्ट समजलेली नाही, की लग्ना अगोदर बायकोसोबत पिक्चर पाहण्यात एव्हढं काय थ्रिल आणि आनंद असतो.

# मोह

संसारात प्रत्येक व्यक्तिला कशातनी कशात लहान पासून ते मोठ्यांन पर्यंत वृद्ध वयस्क म्हतारा म्हतारी यांना सुद्धा मोह आवरला जात नाही.शेतीबाडी,बंगला,माडी, इस्टेट, बारदान, पैसा, आडका राजकारण, खुर्ची,पद,प्रतिष्ठा हा प्रत्येकला प्यारा असतो. माणूस जीवनभर काबाड कष्ट करून जमा पुंजी करीत असतो. संसाराचं गाडं हा चालवित असतो.जीवनात सुख दुःख हे येत असतं आणि ते पार करतांना खुप सहन करावं लागतं.माणूस हा कितीही प्रामणिक असु द्या पण जीवनात काहीना काही हे सापडत असतं.कोणाला सोनं, चांदी, पैसा आडका सापडतं हे सापडनं ज्याचा त्याचा नशीबाचा भाग असतो.आणि तो भाग्यवान माणूस कधी शोधायला जात नाही ते ऑटोमेटिक भेटतं. आपण त्यात खुश होत रहातो. ज्याचं हरवतं त्याला खुप दुःख होत असतं.आपण ते कधी परत करण्यासाठी साधा प्रयत्न देखील करत नाही. म्हणून मोह हा आपला कधीच सुटत नाही व सुटणारही नाही असाच एक प्रसंग हा माझ्या बाबतीत घडला आहे.आणि ही वास्तविका आहे.मी रस्त्याच्या कडेने जात होतो. मला सुंदर अशी पेन सापडली तरी



मी तिला उचलली आणि शर्टच्या खिशात टाकली. कारण मला वेळ नव्हता.तिला व्यवस्थित आहे की नाही बघायला.जवळ जवळ मी दोन तीन तासांनी तिच्याकडे बघितलं पाहतो तर काय शर्टच्या खिशात संपूर्ण शाही ही फुटलेली होती. नवाकरकरीत शर्ट हा खराब झाला.घरी आल्यावर मी ती शाही धुन्या साठी बरीच प्रयत्न केलीत.हा साबुन लाव तो साबुन लाव हे लिक्वीड लाव ते लाव पण ते काही निघत नव्हतं.शेवटी मी कंटाळलो आणि.सातशे रुपयाचा शर्ट हा खराब झाला.दहा रुपयाच्या पेना पाई म्हणून मी सांगतो आयुष्यात ही अशी चुक कधी करणार नाही.आणि कोणताही मोह कधी ठेवणार नाही.माझी चुक मला कळली हीच माझ्यासाठी खुप मोठी शिकवण आहे.तरी आपणही कोणत्याही मोहास बळी पडू नका हेच माझं या लेखा व्दारे आपणास सांगणे आहे.

**-दिलीप हिरामण पाटील**
कापडणे ता.जि.धुळे
मो.नं.९६७३३८९८७३

# शब्दझुला

## मनामनातून..

मराठी मराठी दुधावर साय
मराठी आमुची आहे खरी माय
करूया जतन ह्दयात ठेवू
अटकेपारच झेंडा तिचा नेऊ
नको विस्मृतीत नका हो पराई
जमेल तितके होऊ उतराई
तिलाच भजूया तिलाच पुजूया
सदैव मनात तिला साठवू या
ओठांवर ठेवू नेहमीच तिला
मराठी पुजू आमुच्या पाचविला
खूप खूप वाचू खूप खूप बोलू
काट्याने लिहिली, तुरुंगात कोलू
आपण वाढवू निश्चयाचे बळे
बघा मग कशी धावेल ती,फळे
स्वत:पासून करा सुरूवात
उजळेल तिचा आपोआप पोत
नका सांगू कोणा स्वत:च लढू
माय मराठीचे पांग स्वत: फेडू
ध्वजा ती पताका घेऊ खांद्यावर
मनामनातून करेल ती घर.

**-प्रा.सौ.सुमती पवार**
नाशिक, ९७६३६०५६४२

## गौरव माय मराठीचा

*म* राठी आपली मातृभाषा
*रा* खू तिचा अभिमान
*ठी* बकू ना देवू जराही तिला
*रा* खू आपण तिची शान !!
*ज* न्मदात्री सम तिचे अढळ स्थान
*भा* षा ही साधी-सोपी,रसाळ महान
*ष* डज सुरेल लावुनिया आपण
*आ* ई मराठीचे गावू गुणगान !!
*गौ* रवू तिजला सारे मिळुनी
*र* क्षण करु तिचे भान राखुनी
*व* रदानात आम्हा परमेश्वराने
*दि* धले भाग्य लाभण्या माय मराठीचे !!
*न* भी सूर्य-चंद्र आहेत तोवर
राहीन मराठी अभिजात स्तरावर
अशी प्रतिज्ञा करु सारे मिळुनी
माय मराठीच्या गौरव दिनी !!

**-विमल प्रकाश पाटकरी**
९०२८०५५९११

## माझ्या मराठीचे कौतुके

माझ्या मराठी कौतुके
देहू आळंदी राऊळ
पंढरीच्या विटेवर
रूप विठ्ठल सावळं
ज्ञाना नामा तुका चोखा
नाथ जनाई कुंभार
अमृताची धार वाहे
सत्सज्जना मुखावर
किती लाघवी लावण्य
परसात परिमळ
हिचा मराठी हो बाणा
चंद्रभागा सम निर्मळ
पुढे वारसा चालवी
थोर साहित्यिक फार
मराठीच्या रक्षणात
येती पुस्तके अग्रेसर
इथे बोलावी मराठी
इथे वाचावी मराठी
गोड अमृताहुनी ही
भाषा मधाळ मराठी
हिचे लेखक फार
रसिक वाचक फार
जगी नाही तोड हिला
हिचा स्वाभिमान फार
माझे मराठी कौतुके
आम्ही गाईन पोवाडे
मुखी अभंग सज्जना
ओवी भजन भारूडे

**-चंद्रशेखर कासार**
धुळे, ८२०८६६७४७७



## माय मराठी..

माझी माय मराठी बोली
असे तिचे अवीट गोडी...
बोल असती अतिव सुंदर
आम्ही न तिची पाठ सोडी...
महाराष्ट्राची राजभाषा
मान असे हा तीचा खरा...
परराज्याची भाषा येऊन
मराठी झाली बाजूला जरा....
महाराष्ट्राची राजधानी
मुंबई आहे मुकुटमणी...
परराज्यातून पाहुणे आले
पण स्थायिक होऊन झाले
शिरोमणी....
लाज वाटते मातृभाषेची
बोलणारा ठरतो अडाणी...
का बोलता इंग्रजीतून
अशी कोण हो ती महाराणी?....
शाळा सगळ्या इंग्रजी माध्यम
मराठी शाळा बंद पडे....
काहो दुस्वास इतका मराठीचा?
हे कोडे मजला न उलगडे....
आता मान मिळाला आहे
अभिजात भाषेचा दर्जा मिळाला...
मी मराठी , मातृभाषा मराठी
मिळेल साऱ्या ग्रंथांना आता उजाळा...

**-विजया भट,** धुळे

## नाही राजभाषा केवळ अमुची मराठी

नाही राजभाषा केवळ अमुची मराठी..
नाही राजभाषा केवळ अमुची मराठी;
ढोल तुतार्यांतूनही गर्जतो नाद मराठी!
नाही राजभाषा केवळ अमुची मराठी;
मावळ्यांच्या पेहरावाला साज मराठी!
नाही राजभाषा केवळ अमुची मराठी;
गड किल्ल्यांना शौर्याचा बाज मराठी!
नाही राजभाषा केवळ अमुची मराठी;
संत सज्जनासंगे हासे निर्व्याज मराठी
नाही राजभाषा केवळ अमुची मराठी;
अमृतास पैजा जिंकते रसराज मराठी!
नाही राजभाषा केवळ अमुची मराठी;
जुलमी विकृतांचा मिटवी माज मराठी!
नाही राजभाषा केवळ अमुची मराठी;
दिल्लीश्वरांस नियंत्रिते शिवराज मराठी!


**-गुलाबराव धंजी मोरे**
धुळे, ९४०४१९०४३२


# विज्ञान एक वरदान..!

प्रदीप मनोहर पाटील
गणपूर ता.चोपडा, मो. ९९२२२३९०५५

जीव निर्मिती होऊन अंनत काळा नंन्तर माणुस विज्ञान वादी बनला. असं म्हणतात पण हे खरं नाही असं मला वाटतं मानव तसा सुरवाती पासुन संशोधक असला पाहिजे नव्हे होता फक्त त्याच स्वरूप बदललं त्याला विज्ञान नाव दिल गेलं. मानव निर्मिती नंन्तर सुरवातीला शोधक नजर ठेवुन सुरवात आग कशी पेटवायची ती निर्माण केली अन्न शिजवुन खाऊ लागला. स्वरक्षण साठी दगडा पासुन हत्यार बनवले. नंन्तर विळे गोफण कुऱ्हाड पुढे ढाल तलवार. पुढे तोफ बनवली. अणुबॉम्ब पर्यन्त पोहचलो.

माती कोणती कशी त्या पासुन भांडी बनवली. रंग शोधुन काढले. नंन्तर जमिनीतुन खनिज काढु लागला लोखंड सोन चांदी शोधुन काढलं . त्या पासुन वस्तु बनवल्या पशु पक्षी यांना माणसाळून त्यांच्या मार्फत कामं करू लागला. ग्रह तारे यांचा अभ्यास करून वारे कसे वाहताय मग पाऊस कसा पडणार कोणते पक्षी कशी हालचाल करतात हे शोधुन बोध घेऊ लागला त्यांनी घरटं कुठं बांधली यावरून पण पावसाळ्याचा अंदाज घेऊ लागला. कोणतं अन्न खायचं हे शिकला नंन्तर शेती करू लागला. अवकाश हालचाली शोधुन ग्रह ताऱ्यांना नाव दिली. आज अतिरिक्त वाढ म्हणजे नवीन शोध लागला असं आपण म्हणतो म्हणतं आलोय हे खरं . घोडे स्वारी नंतर घोडागाडी, बैलगाडी, सायकल, गाडी, विमान पर्यन्त बनवले . अगोदर झोपडी मग घर महाल नंन्तर किल्ले बनवु लागला. तराफा मग छोटया माणसं वलवणाऱ्या बोट. मग जहाज. लिखाण करू लागला अगोदर कोरड्या पानावर, मातीवर कापड मग कागदावर बोरू वापर असे अंनत शोध पुर्वी माणसाने लावले हे पुरातन काळ पासुन अविरत नवं नवीन शोध माणसाने लावले त्यात प्रगती होतं गेली आणि हवेत उडत अवकाश भ्रमण पर्यन्त माणुस पोहचला..





आजची साधनं पर्यन्त आला पण आज मानव जीवसृष्टीत आहे पण जीवसृष्टी पासुन अलिप्त होतं जातोय.. पुर्वी पशु पक्षी चल अचल सृष्टी सोबत संवाद करत असे आता तो वेळ नाही मानवा जवळ त्या पासुन दुरावतोय असं वाटतं पण फायदे भौतिक सुख अंनत वाढले. शोध अंनत लागल्या मुळे..आपल्या सर्व गरजा पुर्ण करणारी, चमत्कारिक वाटणारी विविध रहस्य उलगडणारी शक्ती म्हणजे विज्ञान. एक परीस सारख लाभलेले विज्ञान वाटतं. क्रांतिकारी नवं नवीन शोध लागले बरीच कामं यंत्र करू लागले माणसाच्या खुप गरजा विज्ञान पुरवू लागल्या मुळे माणुस आळशी बनु लागला थोडा.. विज्ञान मुळे होणारा निसर्गावर अघाद खुप मोठा आहे समजुन न येणारा.. पण मानवास उंच नेणारं विज्ञान आहे.. अंधश्रद्धा मोडीत निघुन विज्ञान कास लोक धरत आहेत.. विज्ञानाने साधनं सामुग्री ओघ प्रचंड वाढतोय. पुढे पचवता आलं पाहिजे मानवास फक्त. सृष्टीने ने अंगीकारले पाहिजे विज्ञानि बोजा स्वीकारलं तर कल्याण आहे नाही तर शाप ठरेल. विज्ञान दिवशी लिहलेला लेख आज राष्ट्रीय विज्ञान दिवस आहे. त्या निमित्त प्रसिद्धी साठी आज पाठवतोय त्यात मी शेवटी लिहलं होतं सृष्टीने स्वीकारलं पाहिजे आताची वेळ काहीतरी तसंच सांगते.

## पान १ वरुन

### कराड हाच नंबर एकचा आरोपी

धमकावले होते. पुढे याच प्रकरणात दोन कोटी रुपयांची खंडणी मागितली. या सर्व आरोपींचे आवाजाचे नमुने व त्याचे मेमरी कार्ड पुरावे म्हणून दोषारोप पत्रात नोंदवले आहेत. मात्र आरोपी विष्णू चाटे याचा भ्रमणध्वनी नष्ट झाला असल्याचे दोषारोप पत्रात मान्य करण्यात आले आहे. मात्र, हत्येच्या गुन्ह्यातील आरोपी क्रमांक सहा संतोष देशमुख यांना मारहाण करत असताना हसत आनंद साजरा करत असल्याचे छायाचित्रणही न्यायालयात सादर करण्यात आले आहे.वाल्मिक कराड याला अटक केल्यानंतर त्याचा फिकट निळ्या रंगाचा आयफोन, सोनेरी रंगाचे अन्य दोन भ्रमणध्वनी संचही ताब्यात घेतले असून आरोपींशी झालेल्या संभाषणाच्या आधारे दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे. संतोष देशमुख यांची हत्या ज्या लोखंडी लोखंडी पाईप, त्याला करदोड्याने बांधून बनवलेली मूठ, आरोपीच्या काळ्या रंगाच्या गाडीत तसेच पाईपला लागलेले रक्ताचे डाग यांचे उल्लेखही दोषारोपामध्ये करण्यात आले आहेत. आरोपींचे मोबाईल, त्यांच्या गाडीत सापडलेले टी शर्ट, गॉगल, एटीएम कार्ड, प्रादेशिक परिवहन विभागाने गाड्यांसाठी दिलेले प्लास्टिकचे कार्ड अशा अनेक वस्तू तपासकामी ताब्यात घेतल्याचा दोषारोप पत्रात उल्लेख आहेत. खंडणीच्या गुन्ह्यात आडवे आले म्हणून संपवा अन्यथा आपण भिकेला लागू, असे म्हणत वाल्मिकच या गुन्ह्यातील सूत्रधार असल्याचे दोषारोपात म्हटले आहे. या आरोपींमधील सुदर्शन घुले आणि त्याचे साथीदार संघटित गुन्हेगारी करत होते. त्याने व त्याच्या साथीदाराने केज, अंबाजोगाई, धारुर व धाराशिव जिल्ह्यातील कळंब येथे १० वर्षात ११ गुन्हे केले असल्याचे दोषारोपात म्हटले आहे.

### एक महिन्याची मुदतवाढ

रजिस्ट्रेशन नंबरप्लेट देणे बंधनकारक केले आहे. तेव्हापासून नव्याने वाहन खरेदी केल्यानंतर या नंबरप्लेट उपलब्ध होतात. हाय सिक्युरिटी नंबरप्लेट वाहनाच्या सुरक्षिततेसाठी आणि सोयीसाठी तयार करण्यात आली आहे. एप्रिल २०१९ नंतर बाजारात येणाऱ्या सर्व वाहनांना ती अनिवार्य आहे. तसेच २०१९ पूर्वीच्या जुन्या वाहनांनादेखील परिवहन विभागाने उच्च सुरक्षा पाटी (एचएसआरपी) बंधनकारक केले आहे. त्यानुसार ३० एप्रिलपर्यंत हाय सिक्युरिटी नंबरप्लेट लावून घ्यावी लागणार आहे असे आवाहन आरटीओकडून करण्यात आले आहे.

### डॉ.मीना प्रभू यांचे निधन

एमबीबीएस पदवी संपादन केल्यानंतर पुढील शिक्षण त्यांनी मुंबईत घेतले. विवाहानंतर त्या इंग्लंडला गेल्या. तेथे त्यांनी अनेक वर्षे भूलतज्ज्ञ आणि जनरल प्रॅक्टिशनर म्हणून रुग्णसेवा केली. वैद्यकीय क्षेत्रातील काम सुरू असताना त्यांनी मराठीत प्रवासवर्णनपर लेखनास सुरुवात केली. पुढे त्यांनी कादंबरी लेखन केले. त्यांचे कवितासंग्रहही प्रकाशित झाले.

### नंदुरबारमध्ये संभाजी ब्रिगेड आक्रमक

सामाजिक तेढ निर्माण करण्याचा प्रयतक केला आहे. तसेच इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत यांना जीवे मारण्याची धमकी दिली आहे. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांचे नाव घेऊन सदर व्यक्तीने ही वक्तव्ये व धमकी देत असल्याने हे प्रकरण संवेदनशील आहे.

सदर ऑडिओ कॉल रेकॉर्डिंग इंद्रजीत सावंत यांच्या वॉलवर उपलब्ध आहे. राज्य सरकार, गृह विभाग व पोलिस प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन प्रशांत कोरटकर या व्यक्तीवर तात्काळ गुन्हा दाखल करून त्याला अटक करावी आणि त्याच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करावी,अशी मागणी करण्यात आली आहे. यावेळी निवेदनावर संभाजी ब्रिगेड जिल्हाध्यक्ष सम्राट बिऱ्हाडे, जिल्हा उपाध्यक्ष स्वप्नील पाडवी, महासचिव किशोर बाविस्कर, सचिन बैसाणे, शहराध्यक्ष अजय सोनार, जिल्हा प्रमुख तर नाशिर शेख, प्रसिद्ध प्रमुख मुकेश चौधरी, नरेंद्र पाटील यांच्या सह्या आहेत.

### ट्रान्सपोर्ट कार्यालय फोडणारा चोरटा जेरबंद

तासांच्या आत ताब्यात घेवून विचारपूस केली असता त्याने चेरीची कबुली दिली. न्यायालयासमोर या गुन्ह्याबाबत उभे केले असता न्यायालयाने तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. आरोपी जावीद अब्दूल रहेमान खान याच्याकडून पन्नास हजारांपैकी शेहेचाळीस हजार पाचशे रूपयांची रोख रक्कम, पाच हजार रूपये किंमतीचा मोबाईल शंभर रूपये किमतीचे पाकीट असा एकूण एक्कावन्न हजार सहाशे रूपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे, उपविभागीय पोलीस अधीकारी राजकुमार उपासे यांच्या मार्गदर्शनाखाली चाळीसगाव रोड पोलीस स्टेशनचे सपोनि. जीवन बोरसे, पोकॉ.शोएब बेग, अतीक शेख, सिराज खाटीक, सचिन पाटील, विनोद पाठक, मनोज भामरे यांनी केली. या गुन्ह्याचा पुढील तपास पोहेकॉ.सुनिल पाथरवट करीत आहेत.

### तेरा वर्षीय विद्यार्थिनीची आत्महत्या

म्हसावद पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश वारुळे, नंदुरबार आदिवासी विकास प्रकल्प विभागाचे प्रकल्प अधिकारी चंद्रकांत चव्हाण, आमदार तथा आदिवासी विकास समितीचे अध्यक्ष राजेश पाडवी यांच्यासह परिसरातील नागरिक व विविध संघटनांच्या प्रतिनिधींनी भेट दिली.

सकाळी सव्वानऊ वाजेच्या सुमारास मयत मुलीचे काका व धडगाव तालुक्यातील अट्टी येथील पोलीस पाटील सुरसिंग सरदार वसावे यांना धडगाव पोलीस ठाण्यात दूरध्वनीद्वारे माहिती देण्यात आली. त्यांनी अतिदुर्गम भागातील मुलीचे पालक लाहिऱ्या वसावे यांना माहिती दिल्यानंतर दुपारी दीड वाजेच्या सुमारास तिचे सर्व नातेवाईक हे सुलतानपूर येथे पोहोचले. तोपर्यंत मृतदेह आहे त्याच अवस्थेत ठेवण्यात आलेला होता.सुलतानपूर आश्रम शाळा परिसरात मयताचे पालक व नातेवाईक पोहोचताच त्यांनी आक्रोश केला. आमची मुलगी आत्महत्या करू शकत नाही. एवढे टोकाचे पाऊल उचलण्याची तिची कल्पनाशक्ती नव्हती. यांत काहीतरी वेगळे कारण असावे अशी शंका व्यक्त करत त्यांनी केंद्रीय आश्रम शाळा प्रशासनाला जबाबदार धरले. मुळात सव्वासहा ते साडेसहा वाजे दरम्यान घटना उघडकीस आल्यानंतर नऊ वाजेपर्यंत आम्हाला कुठलीही माहिती आश्रम शाळा प्रशासनातर्फे मिळालेले नव्हती. येथे काहीतरी वेगळे घडावे असावे अशी आमची शंका आहे. पोलिसांनी शाळा प्रशासनावर कारवाई करावी अशी मागणी करत शवचिकित्सा नंदुरबार वैद्यकीय महाविद्यालय व जिल्हा रुग्णालय येथे करण्यात यावी अशी मागणी केल्याने काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. आमदार पाडवी व पोलीस अधिकाऱ्यांनी नातेवाईकांची समजूत घातल्यानंतर दुपारी शवचिकित्सेसाठी मृतदेह नंदुरबार जिल्हा रुग्णालयात रवाना करण्यात आला.

दरम्यान, मुलीने आत्महत्या कां केली हे स्पष्ट होऊ शकले नाही. तिने एवढ्या टोकाचे पाऊल कां उचलले याबाबत उपस्थितांमध्ये तर्कवितर्क लावले जात होते. मुळात घटना उघडकीस आल्यानंतर दोन तासांनी पोलीस प्रशासन व प्रकल्प अधिकाऱ्यांना तर तीन तासांनी मयताच्या नातेवाईकांना माहिती देण्यात आल्यामागे शंका उपस्थित करत नातेवाईकांनी जोपर्यंत घटना स्पष्ट होत नाही तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नाही अशी भूमिका घेतली आहे.

**आ.पाडवींच्या सूचना**

सुलतानपूर येथे घडलेली घटना दुर्दैवी आहे. घटनेची माहिती मिळाल्यानंतर मी स्वतः तात्काळ तिथे पोहोचलो. पोलिसांना या प्रकरणी चौकशीचे आदेश दिले आहेत. तसेच नंदुरबार आदिवासी प्रकल्प विभागाला त्रिसदस्य समिती मार्फत तपास करण्याच्या सूचना दिल्या आहेत. सदर मुलीने एवढे टोकाचे पाऊल कां उचलले, तिच्यावर काही दडपण होते का, अन्य त्रास होता कां? याचा तपास करण्याच्या सूचना पोलिसांना दिल्या आहेत. या घटनेस शाळेचे प्रशासन जबाबदार असल्याचे तपासात उघडकीस आले तर त्यांच्यावर कारवाई करण्याच्या सूचना दिल्या आहेत. यातील दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असे आ.राजेश पाडवी यांनी सांगितले.

## पान १ वरुन

### नंदुरबारच्या कुणालनगरमध्ये चोरी

परतल्यानंतर घरफोडी झाल्याचे उघडकीस आले. त्यांनी घरातील स्वयंपाक गृहात प्रवेश केल्यावर कपाट फोडल्याचे दिसून आले. पर्समध्ये ठेवलेले सुमारे ३२ तोळे सोन्याचे दागिने, रोकड नसल्याचे लक्षात येताच त्यांनी उपनगर पोलिसात धाव घेतली. पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी भेट दिली. श्वान पथक व ठसे तज्ञांना पाचारण करण्यात आले. श्वानने परिसरातील एका चौकापर्यंत माग दाखविला व त्यानंतर घुटमळत राहिला. घटनास्थळी उपविभागीय पोलीस अधिकारी संजय महाजन, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील, उपनगर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संजोग बच्छाव, पोलीस उपनिरीक्षक अमोल देशमुख आदींच्या पथकाने भेट दिली.

### दिव्यांगाची गळफासाने आत्महत्या

निष्पन्न झाले. एक मार्चला सकाळी त्यांचा मुलगा प्रशांत सनेर याने थाळनेर पोलिस ठाण्यात दिलेल्या माहितीवरुन अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली. प्रशांत सनेर याने पोलिसांना दिलेल्या माहितीनुसार, २०१२ मध्ये ज्ञानेश्वर सनेर यांचा अपघात झाला होता. त्याची अपघात विमा भरपाई म्हणून २०१६-१७ मध्ये त्यांना १६ लाख रुपये मिळाले होते. ही रक्कम त्यांनी स्वत:च्या नावावर बँक खात्यात ठेवली होती. त्या रकमेवरुन सनेर यांचा त्यांचे मित्र शरद गुलाबराव सनेर यांच्याशी २०१९-२० पासून वाद सुरु होते. शरद सनेर याचे कुटुंबियही ज्ञानेश्वर सनेर यांच्याशी भांडत होते. त्याच वादाला कंटाळून ज्ञानेश्वर सनेर यांनी गळफास लावून आत्महत्या केल्याचा संशय प्रशांत सनेर याने अर्जात व्यक्त केला आहे. उपनिरीक्षक दिलीप पवार पुढील तपास करीत आहेत.

### सरकारच्या निषेधार्थ आंदोलन

दि.३ मार्च रोजी विधानसभेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर राज्यव्यापी निषेध आंदोलन करण्यात येणार आहे. त्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे कार्याध्यक्ष, महाराष्ट्र राज्य कॉटन फेडरेशनचे अध्यक्ष मा.आ.कुणाल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली धुळे तालुका काँग्रेस कमिटीतर्फे सोमवार दि.३ मार्च रोजी सकाळी १० वा. क्यूमाईन क्लब, जेलसमोर धुळे येथे शेतकऱ्यांच्या प्रश्नावर निषेध आंदोलन करण्यात येणार आहे. धुळे तालुका काँग्रेस कमिटीचे ज्येष्ठ पदाधिकारी साहेबराव खैरनार, बाजीराव पाटील, गुलाबराव कोतेकर, लहू पाटील, भगवान गर्दे, भगवान पाटील, विशाल सैंदाणे, पंढरीनाथ पाटील, वसंत पाटील, डॉ.दत्तात्रय परदेशी यांच्या प्रमुख उपस्थितीत होणाऱ्या आंदोलनात धुळे तालुक्यातील आजी माजी जि.प.,पं.स.सदस्य, सभापती, आजी माजी सरपंच, युवक काँग्रेस, महिला काँग्रेस, सेवा दल, एससी,एसटी,ओबीसी,उद्योग अवजड वाहन, ग्राहक संरक्षण सेल पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन धुळे तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष डॉ.दरबारसिंग गिरासे यांनी केले आहे.

### शेतात केबलच्या चोऱ्या

आबा सुखा ठेलारी, पुंडा सुखा ठेलारी या शेतकऱ्यांच्या स्टार्टर ते पाण्यातील मोटारी पर्यंत जाणाऱ्या तांब्याच्या वायर ओढून चोरून नेल्या आहेत. शुक्रवारी गावामध्ये सिनेमा होता. यामुळे सगळे गाव एका ठिकाणी जमले होते. या संधीचा फायदा घेत चोरट्याने या मोटारींच्या वायर चोरून नेल्या. विशेष म्हणजे चोरटे स्थानिक असल्याने त्यांनी स्टार्टर चोरून नेले नाहीत तर दुसरीकडे ल्युमिनियमच्या वायरचे बंडल शेतात पडले असताना त्यांना हात लावलेला नाही. असे प्रकार वारंवार होत असल्याने कोणीतरी तात्पुरत्या लाभासाठी वायरी चोरून नेण्याचे प्रकार करत असल्याचे दिसून येते. मागच्या पंधरा दिवसांमध्ये तीन वेळा पाच ते सात दिवसाच्या अंतराने हा प्रकार घडला असून पोलिसांनी यामध्ये हस्तक्षेप करणे आवश्यक झाले. तक्रारी देऊन देखील कारवाई होत नसल्याने नाराजीचा सूर सर्वत्र व्यक्त केला जात आहे.

### ऊस तोड कामगारांना ठेकेदाराने डांबून ठेवले

तसेच महिला मजूरांनाही जीवेठार मारण्याची धमकी देत असल्याचे तक्रारीत म्हटले आहे. डांबून ठेवण्यात आलेल्या मजूरांनी आपली तक्रार मांडण्यासाठी सुपा पोलिस स्टेशन (ता.बारामती, जि.पुणे) येथे धाव घेत आपल्या समस्या मांडून सुटका करण्याची मागणी केती. परंतू ऊस तोड कामगारांच्या तक्रारीची सुपा पोलिस ठाण्याकडून कुठलीही दखल घेतली नसल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला. संपूर्ण मजूर रात्रभर सुपा पोलिस स्टेशनला थांबले. मात्र पोलिस प्रशासनाकडून त्यांना कुठलाही प्रतिसाद मिळाला नाही. मजूरांना बोलविणाऱ्या दोघा संशयीतांकडून महिलांना मारहाण करण्यात आल्याचा आरोपही तक्रारीत करण्यात आला आहे. परंतू सुपा पोलिस प्रशासनाकडून दखल तर घेतलीच गेली नाही त्या उलट पोलिस ठाण्यातून त्यांना हाकलून लावले दरम्यान आदिवासी ऊस तोड कामगारांवर दोघा संशयीतांकडून अन्याय अत्याचार केले जात असल्याने आदिवासी मजूरांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. नंदुरबार जिल्हा प्रशासन व पोलिस विभागाने ऊस तोड कामगारांची सुटका करावी, अशी मागणी तक्रारीतून सायसिंग गुलाबसिंग वळवी यांनी केली असून मजुरांची सुटका करावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते साऱ्या पाडवी यांनी केली.

### हडसुणे ग्राम पं.चा सदस्य ठेलारी अपात्र

घोषित केले. हडसुणे ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत सदस्य पदावर पोपट मांगु ठेलारी निवडुन आले. पोपट ठेलारी यांना सात अपत्ये असल्याचे निवडणुक लढवितांना दिलेल्या माहितीत लपवले. दोनपेक्षा अधिक अपत्य असल्यास निवडणुक लढता येत नाही असा नियम असतांना ठेलारी यांनी खरी माहिती लपवून ठेवली. याबाबत भारत देवरे यांनी हरकत घेवून ॲड.विशाल साळवे यांचेमार्फत जिल्हाधिकाऱ्यांकडे विवाद अर्ज दाखल केला. जिल्हाधिकाऱ्यांनी भारत देवरे व पोपट ठेलारींची लेखी, तोंडी युक्तीवाद ऐकला. पोपट ठेलारींना अपात्र घोषित करावे असा युक्तीवाद ॲड.विशाल साळवेंनी केला. जिल्हाधिकाऱ्यांनी ॲड.साळवे यांचा युक्तीवाद व दोन्ही बाजुंचे कागदपत्र तपासून हडसुणे ग्रामपंचायतीचे सदस्य पोपट ठेलारींना अपात्र घोषित करण्याचा आदेश दि.२७ जानेवारी २०२५ रोजी दिला. अर्जदारातर्फे ॲड. साळवेंनी कामकाज पाहिले. त्यांना ॲड. मोनाली करडक, ॲड.कमलाक्षीदेवी पाटील यांचे सहकार्य लाभले.

### शेतकऱ्यांशी सतत संपर्कात राहणार

बैठक घेऊन शेतकऱ्यांच्या अडचणी सोडविल्या जातील. यासोबतच महिन्यातुन एक दिवस राज्यातील शेतकऱ्यांसोबत चार तास ऑनलाईन मिटींग वावुन शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणी सोडवु. यासोबतच शासकिय कृषी पुरस्कार प्राप्त शेतकरी संघ महाराष्ट्र राज्याच्या विनंती नुसार शेतीविषयक अकरा विषयांवर (पुरस्कार प्राप्त शेतकऱ्यांच्या मागण्या, जमिनीची उत्पादकता वाढविणे, शेती साठी रोजगार हमी योजनेतुन मजुरी देणे, कृषी विद्यापीठांना सक्षम करणे, पिक विमा योजनेत सुधारणा करणे, जास्त उत्पादनाच्या बियाणेचे संशोधन करणे आदी) चर्चा करुन निर्णय घेणेसाठी मंत्रालयात संबंधित अधिकाऱ्यांसोबत बैठक अधिवेशनानंतर लावण्याचे आश्वासन दिले. यासोबतच शासनाच्या कृषि विषयक समित्या आहेत, त्यावर पुरस्कार प्राप्त शेतकऱ्यांना सदस्य म्हणुन घ्यावे, असा शासन निर्णय लवकरच घेऊ असे जाहीर केले.

केळी फळपिकाच्या लागवडीसाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत अनुदान दिले जाते. मात्र त्याकरिता पाच एकरच्या आत व रोजगार कार्ड धारक ही अट आहे. त्यावरील क्षेत्रासाठी लाभ दिला जात नाही. मात्र इतर सर्व फळपिकांना कै.पांडुरंग फुंडकर फळ लागवड योजनेतुन सुध्दा लाभ दिला जातो. तसेच केळी फळपिका सुद्धा लागवडी साठी दोन्ही योजना पैकी एकाचा लाभ देणे बाबत विनंती केली. याबाबतही त्यांनी सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन दिले. शेतकऱ्यांना उच्च दर्जाचे प्रमाणित बियाणे उत्पादनाला प्रोत्साहित करुण शेतकऱ्यांपर्यंत लवकर कसे पोहचवता येईल, याबाबतही ते प्रयतक्शील राहतील असे सांगितले.

### लोकअदालतीचे आयोजन

(पान १ वरुन) तडजोडीसाठी प्रकरण ठेवता येते. तसेच लोकअदालतमध्ये प्रकरण सामोपचाराने तडजोड झाली नाही तर ते नियमित न्यायालयाकडे चालविता येते. राष्ट्रीय लोक अदालतमध्ये प्रकरणे तडजोडीने निकाली केल्यास लोकांचा पैसा आणि वेळेची बचत होते. पक्षकारांना तात्काळ न्याय मिळतो. न्यायालयात भरलेले कोर्ट फी नियमानुसार परत मिळते. अशी माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव तथा न्यायाधिश संदीप व्ही.स्वामी साहेब यांनी दिली आहे.


**घर विकणे आहे**
चार मजली (RCC) उत्तरमुखी सदर बाजार पेठेतील घर 16x24 ग.नं.२, धुळे
-: संपर्क :- 9422788390

**हार्दिक अभिष्टचिंतन**

मा.श्री.विजय उध्दवराव कुळकर्णी (विजुनाना)
(विद्यमान आमदार मंजुळाताई गावीत यांचे पीए)
आज आपणास वाढदिवसानिमित्त हार्दिक अभिष्टचिंतन व मन:पूर्वक शुभेच्छा!
* शुभेच्छूक *
दिलीप भावसार
भावसार टी.व्ही. सेंटर धुळे.

**पाहिजे**
अनुभवी फार्मासिस्ट पाहिजे.
-: संपर्क :- 9823833108 8788637592

**फ्लॅट भाड्याने देणे**
2 BHK फ्लॅट भाड्याने देणे आहे. अग्रवाल नगर, भारत नर्सरी जवळ, धुळे
-: संपर्क :- 9421799330

**- पाहिजेत -**
• नर्स/स्टाफ
• RMO
डे-नाईट शिफ्टसाठी अनुभवी उमेदवार पाहिजेत
इच्छूक उमेदवारांनी समक्ष भेटावे
यशोदा हॉस्पिटल व नेत्रालय
दत्त मंदीर, देवपूर, धुळे
7058912916, 8329249386

**पाहिजेत**
१) हायवा ड्रायव्हर- ३
२) कार (पिकअप) ड्रायव्हर- ४
वरील पदे ही कन्स्ट्रक्शन कंपनीकरिता पाहिजे. अनुभवी व निर्व्यसनी लोकांनी भेटावे!
-: संपर्क :- संजय पाटील
पारोळारोड, चारभुजा मार्बल जवळ, धुळे
9765552556

**पाहिजेत**
किडस् वेअर करिता अनुभवी सेल्समन त्वरित लावणे आहेत. आकर्षक पगार दिला जाईल.
Blushh KIDS WEAR
आग्रारोड, धुळे
9422786143

**पाहिजेत**
DTP opretor कॉम्प्युटरचे ज्ञान व कोरल software ची माहिती असलेली व्यक्ती पाहिजे. Bio Data व पगाराची अपेक्षेसह समक्ष भेटणे!
जिनेश कमलेश गांधी
गांधी किचन्स,
c/o भारत ऑटो कॉर्पोरेशन, पारोळा रोड, प्रकाश सिनेमा समोर, धुळे

**CVKM जवळ प्लॉट विकणे**
एसव्हीकेएम शाळेजवळ सुसज्ज वसाहतीतील प्लॉट्स विकणे आहे
डि.आर.प्रॉपर्टीज
9422289693

**पाहिजेत**
दुकानात कामासाठी वेटर/हेल्पर पाहिजेत.
पगार : १०,०००/- ते १२,०००/-
समक्ष भेटा!
अन्नपूर्णा
जलगाववाला मावा कुल्फी
म.गांधी चौक, धुळे

**पाहिजे**
वेटर पाहिजे
-: संपर्क :-
हॉटेल प्रिया
धुळे
8087564754

**पाहिजे**
दुकान कामासाठी हेल्पर व अकाऊन्टंट पाहिजे
श्री स्वामी समर्थ ग्लास
देवपूर, धुळे
9767072916

**पाहिजेत**
१) टॅली ऑपरेटर - ०१ २) सेल्समन - ०१
बाहेरगावी फिरस्ती कामाकरिता
३) हेल्पर - ०२
अर्जासह समक्ष भेटा! स.११ ते १, संध्या.५ ते ७
अशोका केमिकल वर्क्स
ई-५७/१, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे

**प्लॉट विकणे**
अग्रवाल नगर, वल्लभ नगर, महावीर सोसायटी, विशाल नगर येथील लहान मोठे प्लॉट विकणे
डि.आर.प्रॉपर्टीज
9422289693

**ऑफिस भाड्याने देणे**
गल्ली नं.५ येथील नाकोडा कॉम्प्लेक्स जवळील दोन कॅबिन्स, वॉशरुमसह ६०० चौ.फू.जागा भाडे कराराने देणे आहे
डि.आर.प्रॉपर्टीज
9422289693

**पाहिजे**
Tally operator पाहिजे. पुर्णवेळ समक्ष भेटावे!
-: संपर्क :-
9423193249

**विकणे आहे**
नवीन RTO कार्यालय रोडवरील आग्रारोड हायवे जवळील सर्व्हे नं.१०४ मधील जिवंत मोठी विहीरीसह 85x60=5100 चौ.फू. हा प्लॉट योग्य किंमत आल्यास विकणे आहे.
-: संपर्क :-
7020261073

**पाहिजेत**
अनुभवी व्हेज, नॉनव्हेज कारागीर, तंदूर कारागीर, वेटर/हेल्पर पाहिजेत.
-: संपर्क:-
8007124449

**पाहिजेत**
मार्केटींग एक्झीक्युटीव्ह (मुलगा) पदवीधर
बॅक ऑफीस/रिसेप्शनिस्ट (मुलगी) पदवीधर /कॉम्प्युटर स्किल
सर्व्हिस इंजिनिअर (मुलगा) पदवीधर/फ्रेशर
पगार - ८००० ते १२००० पर्यंत
संपर्क : शॉप नं. ५१७, श्रीराम शॉपिंग कॉम्प्लेक्स, साक्री रोड, धुळे
मो. 9923196444, 9422770066

**कार्टून पुठ्ठा रु.१६.०० प्रति किलो बंडल**
येथे सर्व प्रकारची रद्दी विकत घेतली जाईल.
मेवावाला जिन कम्पाऊंड
भारत वे ब्रिज, पारोळारोड,धुळे
फोन : 230540
9422296340

**पाहिजेत**
फोटोशॉप/व्हिडीओ एडिटींग/न्यूज रिडर/व्हिडीओग्राफी/प्रॉडक्ट फोटोग्राफी, पार्टटाईम/फुलटाईम/Tally operator
माता हिंगलाज न्यूज चॅनल
ग.नं.४, धुळे
7030966995
9422286386

**पाहिजेत**
रेडीमेड दुकानासाठी अनुभवी सेल्समन, हेल्पर, अल्टर कामासाठी टेलर पाहिजे.
सेलिब्रेशन मेन्स वेअर
आग्रारोड, धुलिया
9421525774

**आकर्षक फॅन्स मॉडेलसह बचत ही ...**
atomberg "Why not?"

क्या आप जानते हैं
इंडक्शन मोटर के बजाय बीएलडीसी मोटर बेहतर क्यों हैं ?
इंडक्शन मोटर वह मोटर है,जिसका अब तक आप इस्तेमाल करते आए हैं. इसमे 75 वॉट बिजली की खपत होती हैं.
एटमबर्ग पंखे बीएलडीसी मोटर से चलते हैं. इनमें बिजली की खपत 35 वॉट होती हैं. इनसे हर साल ₹1500 तक की बचत होती है.
इसका मतलब यह है की हमारे पंखे 3* साल में फ्री हो जाते हैं.
ये इंवर्टर बैटरी पर 3x तक ज्यादा चलते हैं.
इनमें रेग्युलेटर की जरुरत नहीं होती है !

SAVES UP TO ₹1500 IN A YEAR
100% PURE COPPER MOTOR FOR A LONGER LIFE
57 वर्षापासून आपल्या सेवेत...
District Distributor श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोन: 229162, 235763


हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-४००४११५, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०